औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक ७/९/२०११ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक ७/९/२०११ (दिनांक १८-८-२०११ ची तहकूब सभा) रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१२.५० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा. आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

स.सदस्यांची उपस्थिती रजिस्टर प्रमाणे नोंद घेणे.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री.शिंदे राजू रामराव
३. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
४. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.राजगौरव हरिदास वानखेडे
८. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
९. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
१०. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
११. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
१२. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१३. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१४. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१५. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१६. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१७. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१८. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१९. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
२०. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
२१. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव

२२. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते
२३. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२४. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ
२५. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन
२६. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२७. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२८. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२९. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
३०. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
३१. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
३२. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
३३. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३४. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३५. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३६. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३७. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३८. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३९. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
४०. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
४१. स.स.श्रीमती परवीन खैसर खान
४२. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
४३. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
४४. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
४५. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
४६. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
४७. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४८. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४९. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
५०. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
५१. स.स.डॉ.खान जफर अहेमद

५२. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
५३. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
५४. स.स.श्री.खान आगा मिया खान
५५. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५६. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
५७. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५८. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
५९. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
६०. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
६१. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
६२. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
६३. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
६४. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
६५. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर
६६. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
६७. स.स.श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
६८. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
६९. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
७०. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
७१. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७२. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
७३. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
७४. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
७५. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
७६. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
७७. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
७८. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
७९. स.स.श्री.जोशी संजय रामदास
८०. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
८१. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव

८२. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद

८३. स.स.श्री.जैन विकास रतनलाल

८४. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन

८५. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने

८६. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन

८७. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश

८८. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम

८९. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

नामनिर्देशित पालिका सदस्य

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव

०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद

०३. स.स.श्रीमती पाटील रेखा दिनकरराव

०४. स.स.श्री.अभिजीत भास्करराव देशमुख

०५. स.स.श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

चर्चा :-

श्री.त्रिंबक तुपे :आज सकाळी दिल्ली येथे झालेल्या बॉम्ब स्फोटात २० नागरीकांचा मृत्यू झाला, ५०-१०० नागरीक जखमी आहेत मृत्यू झालेल्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी व या भ्याड हल्याचा निषेध करावा.

श्री.प्रमोद राठोड :यास माझे अनुमोदन आहे.

श्री.गिरजाराम हळनोर :जेष्ठ संगितकार श्री श्रीनिवास खळे यांचे निधन झाले त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

मा.महापौर :ठिक आहे सर्वानी श्रध्दाजंली साठी उभे रहावे.

या वेळी दिल्ली येथील बॉम्ब स्फोटातील मृत्यू झालेल्यांना तसेच श्रीनिवास खळे यांना सभागृहाच्या वतीने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.त्रिंबक तुपे :आज दोन सभा आहे ही सभा तहकूब आहे विषयपत्रिका घेण्यात यावी.

श्री.प्रमोद राठोड :एलबीटी लागू केली यामध्ये सर्वांत जास्त पुढाकार घेण्यामध्ये श्री.मानसिंग पवार यांचा मोठा वाटा होता व व्यापारी महासंघाचे श्री. प्रफुल्ल मालानी यांचेही सहकार्य मिळाले यांचा सन्मान करावा अभिनंदन ठराव घ्यावा.

श्री.त्रिंबक तुपे :एलबीटीसाठी यानी अधिका-यांना चांगली मदत केली एलबीटीची चांगल्या प्रकारे वसुली होत आहे. अभिनंदनाच्या ठरावास अनुमोदन देतो.

मा.महापौर :एलबीटी सक्सेस करण्यासाठी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष श्री. प्रफुल्ल मालानी यांचा मोठा सहभाग होता त्यांचे तसेच श्री.मानसिंग पवार यांचेही सभागृहाचे वतीने अभिनंदन करण्यात येते.

विषय क्र.४१९:

दिनांक २६.०४.२०११ (का.प.क्र.१७) दिनांक ३०.०४.२०११ (का.प.क्र.१९) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव:-

दिनांक २६.०४.२०११ (का.प.क्र.१७) दिनांक ३०.०४.२०११ (का.प.क्र.१९) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस मंजूरी देण्यात येते.

विषय क्र.४२०:

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन नगर विकासाचे शासन निर्णय क्र. एमसीओ-१२११/प्र.क्र.१४/नवि-१४, दि.२८/३/२०११ अन्वये राज्यातील सर्व महानगर पालिकांच्या आकृतीबंधात 'अतिरिक्त आयुक्त' या पदाचा समावेश करणेबाबत निर्णय दिला आहे.

सदर शासनानुसार राज्यातील ब,क आणि ड वर्ग महानगरपालिकामध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुथ्यान अभियान आणि यु.आय.डी.,एस.एस.एम.टी.योजनेअंतर्गत प्रकल्प व त्याअंतर्गत सुधार कार्यक्रमही राबविले जात आहेत. केंद्रशासन व राज्य शासनामार्फत विविध योजनांतर्गत महानगरपालिकांना प्रकल्प राबविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो व प्रकल्पाची अंमलबजावणी योग्य रीतीने करण्याची जबाबदारी आयुक्तांना पार पाडावी लागते. त्याचप्रमाणे केंद्रशासन व राज्यशासन स्तरावर होणाऱ्या बैठकांनाही आयुक्तांना हजर रहावे लागते. महानगरपालिकेचे दैनंदिन कामकाज पार पाडण्याबरोबरच वर नमूद केलेली विविध कामे पार पाडत असतांना आयुक्तांना महानगरपालिका मुख्यालयात अतिरिक्त आयुक्त दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे. त्याअभावी आयुक्तांच्या रजेच्या कालावधीत सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याबाबत अडचणी निर्माण होतात.

त्यानुसार सदर शासन निर्णयानुसार शासनाने औरंगाबाद महानगरपालिकेसाठी 'अतिरिक्त आयुक्त' हे एक पद आकृतीबंधात समाविष्ठ केले आहे. सदरील पद हे अवर सचिव या पदाच्या समकक्ष राहील. सदरील पदासाठी येणारा खर्च महानगरपालिका निधीतून करण्यात येईल. तसेच हे पद शासनस्तरावरुनच प्रतिनियुक्तीने भरण्यात येईल,असे निर्देश दिले आहे.

करिता औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 'अतिरिक्त आयुक्त' हे पद निर्माण करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव व शासनाच्या मंजूरीस्तव पाठविणेबाबत विचारार्थ सादर.

चर्चा :-

श्री.गिरजाराम हळनोर :अतिरिक्त आयुक्त मिळाल्यानंतर महापालिकेला काय फायदा होणार

श्री.मुजीब खान : प्रशासनाची काय भुमिका आहे

उपआयुक्त (म) :यापूर्वी राज्यातल्या ड वर्ग महापालिकेत अतिरिक्त आयुक्ताचे पद नव्हते परंतु राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार ड वर्ग महापालिकेची संख्या मोठी आहे जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूथ्यान अभियान , युआयडीएसएसएमटी व इतर ज्या शासनाच्या योजना असतील त्यामध्ये महापालिकेला मोठया प्रमाणात आर्थीक मदत उपलब्ध करून दिली जाते या प्रकल्पाच्या अमलबजावणीमध्ये परीणामकारकता येण्यासाठी व ड वर्ग महापालिकेत आयुक्तांच्यानंतर उपायुक्तांचेच पद आहे त्यातला मधला टप्पा शासनाने ड वर्ग

महापालिकेसाठी मंजूर केला हा निर्णय शासनाने सर्व महापालिकेला कळविले व महासभेची मान्यता घेवून राज्य शासनाकडे हे पद निर्माण करण्याची मान्यतेसाठी औपचारीक पाठविणे आवश्यक आहे मंजूरी नंतर शासनास अवगत करावयाचे आहे शासन निर्णयानंतर पद भरण्यात येईल.

श्री.त्रिबंक तुपे : मंजूरी दिली नाही तरी शासन या पदास मान्यता देणार काय? या अधिका-याचा पगार व इतर खर्च कोण करणार आहे.

उपआयुक्त (म) :शासनाच्या धोरणानुसार व अस्थापनेवर कोणतेही पद निर्माण करतांना महासभेची परवानगी लागते त्यानुसार शासनाने कळविले याचा खर्च महापालिकेला करावा लागेल.

श्री.संजय जोशी : आर्थीक परीस्थिती चांगली नाही या पदासार्ठी महिण्याला १ ते १.५० लक्ष खर्च येणार आहे यापूवी काही पदे मंजूरीसाठी पाठविले मंजुरी आली नाही,मंजूर करणार असेल तर त्यांचा पगार शासनाने दयावा ही अट टाकावी.

श्री.मुजीब खान : एक आयुक्त महापालिकेचा कारभार सांभाळू शकत नाही.का या पदाचा खर्च मागितला तर शासन देणार नाही यासाठी होणारा खर्च महापालिका की शासन देणार प्रशासनाची काय भुमिका आहे शासन पैसा देणार नाही खुलासा करावा.

श्री.संजय जोशी :शासन खर्च देणार नसेल तर आयुक्त काम करण्यास सक्षम आहे दररोज बैठका घेतात या पदाची आज गरज नांही शासनाने बोजा उचलावा नंतर परिस्थिती चांगली झाल्यावर महानगरपालिका पगार देईल.

मा.आयुक्त :शासनाने सर्व महापालिकेसाठी आकृतीबंध दिला शासनाने ४ मे २००६ रोजी हा आकृतीबंध केलेला होता या आकृतीबंधा नुसार वेगवेगळया महापालिकेत ग्रुपनुसार कोणता स्टॉप असला पाहिजे हे दिले मुंबई सारख्या अ वर्ग महापालिकेत ४ अतिरिक्त आयुक्त पदे आहेत ब, व क महापालिकेत सुध्दा आयुक्तांच्या बरोबर अतिरिक्त आयुक्त पद आहे ड वर्ग महापालिकेत हे पद नव्हते मध्यतंरी शासनाने याही महापालिकेत अतिरिक्त आयुक्तांचे पद निर्माण केले शासनाने निर्णय घेतला सर्व बाबी बघून केले आहे जीआर मध्ये , वाढीव कामासाठी मॅनपावरच्या अधिका-याची गरज आहे त्यासाठी अतिरिक्त आयुक्तांचे पद असावे असे शासनाचे म्हणणे आहे.राज्यभर निर्णय लागू केला या महापालिकेला ही कळविले त्यानुसार हा ठराव आलेला आहे काम वाढलेले आहेतच तसेच दिनांक २० जाने. २००४ विषय क्र. २५९ नुसार अतिरिक्त आयुक्त पद असावे असा ठराव यापुर्वीच केलेला आहे.यास ७ वर्ष झाले आता काम वाढलेले आहे या पदाची आवश्यकता आहे.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यात येतो, शासनाकडे पाठविण्यात यावा.
प्रतिनियुक्तीवर येणाऱ्या अधिकाऱ्यांचा पगार शासनाने द्यावा तसा ठराव शासनाकडे पाठविण्यात यावा.

ठराव:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगर विकासाचे शासन निर्णय क्र. एमसीओ-१२११/प्र.क्र.१४/नवि-१४, दि.२८/३/२०११ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेत 'अतिरिक्त आयुक्त' हे पद निर्माण करण्यास आणि शासनाकडून या पदावर प्रतिनियुक्तीने येणाऱ्या अधिकाऱ्यांचा पगार शासनाने देण्यास व या सबधीचा प्रस्ताव शासनास पाठविण्यास मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.४२१:

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक आणि पर्यटन दृष्टया महत्वाचे शहर असून हे शहर मराठवाड्याची राजधानी आहे. या शहरात औद्योगिक प्रकल्प मोठया प्रमाणात आहेत त्याच प्रमाणे मोठमोठे औद्योगिक प्रकल्प या शहरात येत आहेत. अनेक शैक्षणिक संस्था आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळे या शहराचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. शैक्षणिक, औद्योगीक, सांस्कृतिक, वैद्यकीय सेवा सुविधा आणि पर्यटन स्थळांमुळे या शहराची झपाट्याने वाढ होत चालली असून आजुबाजूचे जिल्हे/परिसरातुन मोठ्या प्रमाणात लोक या शहरात स्थलांतरीत होत आहेत परिणामी नवनविन वसाहती उदयास येत आहेत.

सध्या शहराचे दरडोई पाणी परिमाण प्रति व्यक्ती प्रति दिन ८० ते १०० लि. असे आहे. Central Public Health & Environmental Engineering Organization (CPHEEO) मानकानुसार हे प्रमाण १३५ लि.प्रति व्यक्ती प्रति दिन असणे आवश्यक आहे. औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत १०.०० द.ल.ली. प्रति दिन क्षमतेची (हर्सूल) पाणी पुरवठा योजना, ५६.०० द.ल.ली. प्रति दिन क्षमतेची (जायकवाडी) जुनी पाणी पुरवठा योजना व १०० द.ल.ली. प्रति दिन क्षमतेची (जायकवाडी) नविन पाणी पुरवठा योजना या तिन योजना अनुक्रमे सन १९५४, सन १९७५-७६ व सन १९९२ साली राबविण्यात आलेल्या आहेत.

जायकवाडी जलाशयातुन पाणी उपसा होत असलेल्या दोन्ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने ०१ एप्रिल १९९८ रोजी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या आहेत. त्यामुळे १९९८ पासून या योजनांची देखभाल-दुरुस्ती व संचलनाचे काम महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. या योजनांद्वारे शहरामध्ये एकूण निव्वळ पाणी परिमाण १२० द.ल.ली. प्रति दिन प्राप्त होत आहे. शहराची आजची लोकसंख्या अंदाजे १२ लक्ष असून, रस्त्यातील ग्राहक व वितरण व्यय वजा जाता शहरास निव्वळ पाणी परिमाण १६५ द.ल.ली. प्रति दिन प्राप्त होणे गरजेचे आहे. त्यास्तव जायकवाडी येथुन १९५ द.ल.ली. पाणी उपसा घेणे गरजेचे आहे.

अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती व संचलना करीता औरंगाबाद महानगरपालिकेला साधारणत: रुपये ५० कोटी वार्षीक खर्च होतो. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	बाब	एकुण वार्षिक खर्च (रु. कोटी)
१	उचललेल्या कच्च्या पाण्याचा खर्च	२.४०
२	विजेचा खर्च	२७.६०
३	रसायने	१.४५
४	आस्थापनेवरील खर्च	७.४०

५	देखभाल व दुरुस्ती खर्च (स्थापत्य व यांत्रिकी)	८.७५
६	घसारा खर्च	०.८७५
७	वाटर सेस	०.१५
८	व्याज परत फेड व इतर खर्च	१.५०
	एकुण	५०.१२५

औरंगाबाद महानगरपालिकेने सन २००३ मध्ये पाणी पट्टीच्या दरामध्ये वाढ केली होती. सन २००३ नंतर आज पर्यंत पाणीपट्टीच्या दरामध्ये वाढ करण्यात आलेली नाही. पाणीपट्टीची मागणी व योजनेवर होणारा खर्च यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत असूनही महानगरपालिकेने पाणीपट्टीच्या दरात वाढ केलेली नाही.

नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन मार्फत शासन निर्णय क्र. संकिर्ण-२००९ /प्र.क्र.२०७/०९/ न.वि.२० दिनांक ०२ ऑगस्ट २०१० नुसार महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती कार्यक्षम तसेच आर्थिक दृष्ट्या योजना स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने पाणीपट्टीचे दर अंमलात आणण्यासाठी मार्गदर्शक तत्वे विहित केली आहेत. या अंतर्गत प्रामुख्याने पाणीपट्टीचे दर हे नळ जोडणीच्या व्यासाशी निगडीत न ठेवता व्हॉल्युमेट्रीक पध्दतीने निश्चित करणे, व्यावसायीक व औद्योगिक ग्राहकांसाठी स्वतंत्र दर आकारणे, जलमापक यंत्र बसविणे या शिवाय पाण्याच्या उत्पादन खर्चानुसार शहर वासियांना आकारावयाचे पाण्याचे दर काढण्यासाठी विशिष्ट पध्दत सदर शासन निर्णया मध्ये विषद करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णय परिशिष्ट 'इ' वर जोडला आहे.

दिनांक १२.०७.२०११ रोजी मा.ना. श्री. अजित पवार, मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये मा. ना. श्री. राजेंद्रजी दर्डा, मा. मंत्री शालेय शिक्षण, मा. महापौर औरंगाबाद महानगरपालिका, मा. आमदार श्री. सतिश चव्हाण, मा. आमदार श्री. प्रदीप जैस्वाल, मा. आमदार श्री. संजय शिरसाठ, मा. आमदार डॉ. कल्याण काळे, मा. प्रधान सचिव नगर विकास-२, मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मा. सचिव जलसंपदा, मुख्य अभियंता जलसंपदा, मा. व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, मुख्य अभियंता महावितरण, औरंगाबाद महानगरपालिकेचे श्री. काशीनाथ कोकाटे, गटनेता राष्ट्रवादी काँग्रेस, महानगरपालिका आयुक्त व कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा इत्यादी उपस्थित होते. या बैठकीमध्ये औरंगाबाद शहराची पाणी पुरवठा योजना स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने दिनांक ०२ ऑगस्ट २०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे तसेच पाणी पुरवठ्यासाठी होणारा खर्च व समांतर पाणी पुरवठा योजनेसाठी महानगरपालिकेस अदा करावयाची Annual Operational Support Grant (AOSG) ची रक्कम लक्षात घेऊन पाणीपट्टीमध्ये दरवाढ करण्याचे निर्देश मा. प्रधान सचिव-२, नगर विकास यांनी दिले आहेत. सदर बैठकीमध्ये औरंगाबाद महानगरपालिकेने करावयाच्या सुधारणांअंतर्गत उपरोक्त प्रमाणे पाणीपट्टी वाढीचा निर्णय घेऊन शासनास कळविल्या नंतर विद्युत देयका पोटी औरंगाबाद महानगरपालिकेकडे असलेल्या रुपये ३१० कोटी थकबाकी पैकी मुळ मुद्दल रुपये १०० कोटी महानगरपालिकेने दोन महिन्यामध्ये एकरकमी भरणा केल्यास संपूर्ण व्याजाची रक्कम व विलंब शुल्क मिळुन एकुण रुपये २१० कोटी माफ केले जातील असा निर्णय शासनाने घेतला आहे.

या संदर्भाने औरंगाबाद महानगरपालिकेला पाण्याच्या उत्पादनापोटी होणाऱ्या खर्चानुसार येणारे आवश्यक पाणीपट्टीचे दर काढण्यात आले असून सोबत परिशिष्ट 'अ' मध्ये जोडले आहेत. तसेच चालु पाणीपट्टीच्या दराने असणारी मागणी व नविन प्रस्तावीत पाणीपट्टी दराने येणारी मागणी याचा तुलनात्मक तक्ता सोबत परिशिष्ट 'ब' मध्ये जोडला आहे. या अनुषंगाने पाणीपट्टीच्या दरामध्ये वाढ केल्यास महानगरपालिकेस वार्षिक सुमारे रुपये ३४.०० कोटी जास्तीचे मिळतील.

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या समांतर पाणी पुरवठा योजनेच्या निविदा अटी व शर्ती नुसार Concession Period -२० वर्षे आहे. या कालावधीमध्ये महानगरपालिकेच्या वतीने विकासक पाणीपट्टीची वसुली करणार आहे. दर तिन वर्षांनी २५% दराने पाणीपट्टीचे दर वाढविण्यास सर्वसाधारण सभेने यापुर्वीच ठराव क्र.-५५४ दिनांक १८.०८.२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पुढील २० वर्षांकरीता पाणीपट्टीचे दर अंतीम करुन त्याचा समावेश पीपीपी योजनेच्या निविदा प्रक्रियेमध्ये करण्यात आला आहे. योजना कार्यान्वीत झाल्यानंतर हे दर अंमलात येतील असे गृहीत धरुन निविदा कार्यवाही करण्यात आली आहे. सदर दर हे पहिल्या तीन वर्षा करीता नळ जोडणीच्या व्यासावर व पुढे उर्वरित १७ वर्षांकरीता व्हॉल्युमेट्रीक पध्दतीने आकारण्याबाबत पीपीपी निविदेमध्ये समावेश आहे. सदरचे दर परिशिष्ट 'क' मध्ये जोडले आहेत.

पीपीपी योजने अंतर्गत विकासकाला पहिल्या वर्षी रुपये ६३ कोटी Annual Operational Support Grant (AOSG) म्हणून द्यावयाची असून पुढील २० वर्षांपर्यंत सदर AOSG ची रक्कम प्रत्येक वर्षी ६% ने (Escalate) वाढणार आहे. महानगरपालिकेस राबवावयाच्या सुधारणा अंतर्गत दिनांक ०२ ऑगस्ट २०१० च्या शासन निर्णयानुसार पाणीपट्टीमध्ये दरवाढ केल्यास पाणीपट्टी पोटी मिळणारी अपेक्षित फरकाची रक्कम महानगरपालिकेस मिळणार आहे. यामुळे विकासकाला AOSG ची रक्कम देण्यास महानगरपालिकेस मदत होईल. संपूर्ण २० वर्षाच्या करारनामा कालावधी करीता नविन प्रस्तावीत दर (पहिल्या तीन वर्षा करीता नळ जोडणीच्या व्यासावर व पुढे उर्वरित १७ वर्षांकरीता व्हॉल्युमेट्रीक पध्दतीने) काढण्यात आले असून सोबत परिशिष्ट 'ड' भाग -१ मध्ये जोडले आहेत. तसेच काही अपरिहार्य कारणांमुळे जर महानगरपालिका व्हॉल्युमेट्रीक पध्दतीने पाणीपट्टी वसुल करु शकली नाही तर त्याबाबतीत फ्लॅट दराने वाढीव पाणीपट्टीचे दर परिशिष्ट 'ड' भाग -२ नुसार आकारण्यात येतील.

करीता वरीलप्रमाणे परिशिष्ट 'ड' भाग -१ व परिशिष्ट 'ड' भाग -२ नुसार वाढीव पाणीपट्टीचे दर मंजुर करुन या वाढीव पाणीपट्टी दराने चालु आर्थिक वर्षापासून म्हणजे दिनांक ०१ एप्रिल २०११ पासून पाणीपट्टी वसुल करण्याचा तसेच शहरातील शाळा, महाविद्यालये, शासकीय/ निमशासकीय कार्यालय, दवाखाने, चॅरीटेबल ट्रस्ट आणि इतर सेवाभावी संस्था इ. यांना व्यावसायीक दराने पाणीपट्टी आकारण्याचा आणि सर्व मार्गस्थ ग्राहकांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे वेळोवेळी निघणाऱ्या परिपत्रकानुसार ठरविण्यात आलेले दर आणि महानगरपालिकेने ठरविलेले दर यापैकी जे दर जास्त असतील त्या दराने मार्गस्थ ग्राहकांकडुन पाणीपट्टी आकारणेचा प्रस्ताव मा. सर्व साधारण सभे समोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

परिशिष्ट 'अ'
सध्याचे पाणीपट्टीचे दर

अ.क्र.	जोडणीचा आकार इंचात	निवासी रु. प्रति वर्ष	व्यावसायीक रु. प्रति वर्ष
१	१/२	१८००	६५००
	३/४	२९२५	१२०००
	१	६८२५	२५०००
	१.५	३००००	७००००
	२	५००००	१४००००
	३	८००००	२०००००
	४	१२००००	३०००००
	६	२०००००	४०००००
	८	३०००००	----
	उपरोक्त व्यास मीटर सह	रु.८/- प्रती किलो लिटर	रु.३९/- प्रती किलो लिटर
	तात्पुरते / बांधकामाकरीता मीटर सह	-----	रु.३९/- प्रती किलो लिटर

टिपः- मार्गस्थ ग्राहकांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वेळोवेळी निघणाऱ्या परिपत्रकानुसार पाणीपट्टीचे दर लावण्यात येतात.

नविन प्रस्तावीत पाणीपट्टीचे दर (फ्लॅट दर)

अ.क्र.	जोडणीचा आकार इंचात	निवासी रु. प्रति वर्ष	व्यावसायीक रु. प्रति वर्ष
१	१/२	४५००	२२५००
	३/४	७२५०	३६२५०
	१	१६९५०	८४७५०
	१.५	७४५००	३७२५००
	२	१२४१५०	६२०७५०
	३	१९८६५०	९९३२५०
	४	२९८०००	१४९००००
	६	४९६६५०	२४८३२५०
	८	७४५०००	३७२५०००
	उपरोक्त व्यास मीटर सह	रु.१५.००/- प्रती किलो लिटर	रु.७५.००/- प्रती किलो लिटर

	तात्पुरते / बांधकामाकरीता मीटर सह	-----	रु.७५.००/- प्रती किलो लिटर

परिशिष्ट - ब :

चालु पाणीपट्टीच्या दराने असणारी मागणी व नविन प्रस्तावीत पाणीपट्टी दराने येणारी मागणी याचा तुलनात्मक तक्ता

अ.क्र.	व्यास इंचामध्ये	जोडणीची संख्या		सध्याचे वार्षीक पाणीपट्टीचे दर (आकडे रुपयांमध्ये)		सध्याची वार्षीक पाणीपट्टीची मागणी (आकडे लाखात)		प्रस्तावीत वार्षीक पाणीपट्टीचे दर (आकडे रुपयांमध्ये)		प्रस्तावीत वार्षीक पाणीपट्टीची मागणी (आकडे लाखात)	
		घरगुती	व्यावसायीक	घरगुती	व्यावसायीक	घरगुती	व्यावसायीक	घरगुती	व्यावसायीक	घरगुती	व्यावसायीक
१	१/२	९४८८६	६८५	१८००	६५००	१७०७.९५	४४.५३	४५००	२२५००	४२६९.८७	१५४.१२
२	३/४	२६८८	१९५	२९२५	१२०००	७८.६२	२३.४०	७२५०	३६२५०	१९४.८८	७०.६८
३	१	६३६	१५४	६८२५	२५०००	४३.४१	३८.५०	१६९५०	८४७५०	१०७.८०	१३०.५१
४	१.५	४१	१८	३००००	७००००	१२.३०	१२.६०	७४५००	३७२५००	३०.५४	६७.०५
५	२	६८	१५	५००००	१४००००	३४.००	२१.००	१२४१५०	६२०७५०	८४.४२	९३.११
६	३	२३	५	८००००	२०००००	१८.४०	१०.००	१९८६५०	९९३२५०	४५.६८	४९.६६
७	४	१६	६	१२००००	३०००००	१९.२०	१८.००	२९८०००	१४९००००	४७.६८	८९.४०
८	६	८	२	२०००००	४०००००	१६.००	८.००	४९६६५०	२४८३२५०	३९.७३	४९.६६
९	८	५	०	३०००००	०	१५.००	०.००	७४५०००	३७२५०००	३७.२५	०
		९८३७१	१०८०			१९४४.८८	१७६.०३		एकुण	४८५७.८५	७०४.१९
		एकुण ९९४५१				रु. २१२०.९० लक्ष (रु.२१.२१ कोटी)				रु.५५६२.०४ लक्ष (रु.५५.६२. कोटी)	

नोटः- जायकवाडी ते औरंगाबाद दरम्यान मार्गस्थ ग्राहकांकडुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरांप्रमाणे पाणीपट्टीची वार्षीक रक्कम रुपये ४.५० कोटीची वसुली गृहीत धरता पाणीपट्टीपोटी एकुण रुपये ६०.१२ कोटी महसुल अपेक्षित आहे.

परिशिष्ट 'क'

समांतर जलवाहिनीच्या निविदेमध्ये पुढील २० वर्षांकरीता गृहित धरलेले पाणी पट्टीचे दर

अ.क्र.	कन्सेशन कालावधी	जोडणीचा आकार इंचात	निवासी रु. प्रति वर्ष	व्यावसायीक रु. प्रति वर्ष
१	१ ते ३ वर्ष	१/२	१८००	६५००
		३/४	२९२५	१२०००
		१	६८२५	२५०००
		१.५	३००००	७००००
		२	५००००	१४००००

		३	८००००	२०००००
		४	१२००००	३०००००
		६	२०००००	४०००००
		८	३०००००	----
		उपरोक्त व्यास मीटर सह	रु.८/- प्रती किलो लिटर	रु.३९/- प्रती किलो लिटर
		तात्पुरते / बांधकामाकरीता मीटर सह	-----	रु.३९/- प्रती किलो लिटर

२	४ ते ६ वर्ष	पाणी वापर प्रति कि.लि. / जोडणी / महिना	दर रुपये प्रति किलो लिटर	दर रुपये प्रति किलो लिटर
		० - ८	९.००	रु. ४४.००
		८ - १७	१५.००	
		१७ - २३	२३.००	
		२३ पेक्षा अधिक	३०.००	
३	७ ते ९ वर्ष	पाणी वापर प्रति कि.लि. / जोडणी / महिना	दर रुपये प्रति किलो लिटर	दर रुपये प्रति किलो लिटर
		० - ८	११.००	रु. ५३.००
		८ - १७	१८.००	
		१७ - २३	२८.००	
		२३ हुन अधिक	३६.००	
४	१० ते १२ वर्ष	पाणी वापर प्रति कि.लि. / जोडणी / महिना	दर रुपये प्रति किलो लिटर	दर रुपये प्रति किलो लिटर
		० - ८	१४.००	रु. ६४.००
		८ - १७	२२.००	
		१७ - २३	३४.००	
		२३ हुन अधिक	४४.००	
५	१३ ते १५ वर्ष	पाणी वापर प्रति कि.लि. / जोडणी / महिना	दर रुपये प्रति किलो लिटर	दर रुपये प्रति किलो लिटर

		० - ८	१७.००	रु. ७७.००
		८ - १७	२७.००	
		१७ - २३	४१.००	
		२३ पेक्षा अधिक	५३.००	
६	१६ ते १८ वर्ष	पाणी वापर प्रति कि.लि. / जोडणी / महिना	दर रुपये प्रति किलो लिटर	दर रुपये प्रति किलो लिटर
		०-८	२१.००	रु. ९३.००
		८-१७	३३.००	
		१७-२३	५०.००	
		२३ पेक्षा अधिक	६४.००	
७	१९ ते २० वर्ष	पाणी वापर प्रति कि.लि. / जोडणी / महिना	दर रुपये प्रति किलो लिटर	दर रुपये प्रति किलो लिटर
		० - ८	२६.००	रु. ११२.००
		८- १७	४०.००	
		१७-२३	६०.००	
		२३ पेक्षा अधिक	७७.००	

परिशिष्ट 'ड' भाग -१

२० वर्षांच्या कालावधी करीता नविन प्रस्तावित पाणीपट्टीचे दर

(पहिल्या तीन वर्षा करीता फ्लॅट दराने व पुढे उर्वरित १७ वर्षांकरीता व्हॉल्युमेट्रीक दराने)

अ.क्र.	कन्सेशन कालावधी	जोडणीचा आकार इंचात	निवासी रु. प्रति वर्ष	व्यावसायीक रु. प्रति वर्ष
१	१ ते ३ वर्ष	१/२	४५००	२२५००
		३/४	७२५०	३६२५०
		१	१६९५०	८४७५०
		१.५	७४५००	३७२५००
		२	१२४१५०	६२०७५०
		३	१९८६५०	९९३२५०
		४	२९८०००	१४९००००
		६	४९६६५०	२४८३२५०
		८	७४५०००	३७२५०००

		उपरोक्त व्यास मीटर सह	रु.१५.००/- प्रती किलो लिटर	रु.७५.००/- प्रती किलो लिटर
		तात्पुरते / बांधकामाकरीता मीटर सह	-----	रु.७५.००/- प्रती किलो लिटर

२	४ ते ६ वर्ष	पाणी वापर प्रति कि.लि. / जोडणी / महिना	दर रुपये प्रति किलो लिटर	दर रुपये प्रति किलो लिटर
		० - ८	१७.००	८५.००
		८ - १७	२८.००	१४०.००
		१७ - २३	४३.००	२१५.००
		२३ पेक्षा अधिक	५६.००	२८०.००

३	७ ते ९ वर्ष	पाणी वापर प्रति कि.लि. / जोडणी / महिना	दर रुपये प्रति किलो लिटर	दर रुपये प्रति किलो लिटर
		० - ८	२१.००	१०५.००
		८ - १७	३४.००	१७०.००
		१७ - २३	५२.००	२६०.००
		२३ हुन अधिक	६७.००	३३५.००
४	१० ते १२ वर्ष	पाणी वापर प्रति कि.लि. / जोडणी / महिना	दर रुपये प्रति किलो लिटर	दर रुपये प्रति किलो लिटर
		० - ८	२७.००	१३५.००
		८ - १७	४२.००	२१०.००
		१७ - २३	६३.००	३१५.००
		२३ हुन अधिक	८२.००	४१०.००

५	१३ ते १५ वर्ष	पाणी वापर प्रति कि.लि. / जोडणी / महिना	दर रुपये प्रति किलो लिटर	दर रुपये प्रति किलो लिटर
		० - ८	३३.००	१६५.००
		८ - १७	५२.००	२६०.००

		१७ - २३	७६.००	३८०.००
		२३ पेक्षा अधिक	९९.००	४९५.००

६	१६ ते १८ वर्ष	पाणी वापर प्रति कि.लि. / जोडणी / महिना	दर रुपये प्रति किलो लिटर	दर रुपये प्रति किलो लिटर
		०-८	४१.००	२०५.००
		८-१७	६४.००	३२०.००
		१७-२३	९३.००	४६५.००
		२३ पेक्षा अधिक	१२०.००	६००.००

७	१९ ते २० वर्ष	पाणी वापर प्रति कि.लि. / जोडणी / महिना	दर रुपये प्रति किलो लिटर	दर रुपये प्रति किलो लिटर
		० - ८	५०.००	२५०.००
		८- १७	७८.००	३९०.००
		१७-२३	११२.००	५६०.००
		२३ पेक्षा अधिक	१४४.००	७२०.००

परिशिष्ट 'ड' भाग -२

२० वर्षांच्या कालावधी करीता नविन प्रस्तावित पाणीपट्टीचे दर (संपुर्ण फ्लॅट दराने)

अ.क्र.	कन्सेशन कालावधी	जोडणीचा आकार इंचात	निवासी रु. प्रति वर्ष	व्यावसायीक रु. प्रति वर्ष
१	१ ते ३ वर्ष	१/२	४५००	२२५००
		३/४	७२५०	३६२५०
		१	१६९५०	८४७५०
		१.५	७४५००	३७२५००
		२	१२४१५०	६२०७५०
		३	१९८६५०	९९३२५०
		४	२९८०००	१४९००००
		६	४९६६५०	२४८३२५०
		८	७४५०००	३७२५०००

अ.क्र.	कन्सेशन कालावधी	जोडणीचा आकार इंचात	निवासी रु. प्रति वर्ष	व्यावसायीक रु. प्रति वर्ष
२	४ ते ६ वर्ष	१/२	५६५०	२८२५०
		३/४	९०५०	४५२५०

		१	२१२००	१०६०००
		१.५	९३१५०	४६५७५०
		२	१५५२००	७७६०००
		३	२४८३००	१२४१५००
		४	३७२५००	१८६२५००
		६	६२०८००	३१०४०००
		८	९३१२५०	४६५६२५०

अ.क्र.	कन्सेशन कालावधी	जोडणीचा आकार इंचात	निवासी रु. प्रति वर्ष	व्यावसायीक रु. प्रति वर्ष
३	७ ते ९ वर्ष	१/२	७०५०	३५२५०
		३/४	११३००	५६५००
		१	२६५००	१३२५००
		१.५	११६४५०	५८२२५०
		२	१९४०००	९७००००
		३	३१०४००	१५५२०००
		४	४६५६५०	२३२८२५०
		६	७७६०००	३८८००००
		८	११६४०५०	५८२०२५०

अ.क्र.	कन्सेशन कालावधी	जोडणीचा आकार इंचात	निवासी रु. प्रति वर्ष	व्यावसायीक रु. प्रति वर्ष
४	१० ते १२ वर्ष	१/२	८८००	४४०००
		३/४	१४१५०	७०७५०
		१	३३१५०	१६५७५०
		१.५	१४५५५०	७२७७५०
		२	२४२५००	१२१२५००
		३	३८८०००	१९४००००
		४	५८२०५०	२९१०२५०
		६	९७००००	४८५००००
		८	१४५५०५०	७२७५२५०

अ.क्र.	कन्सेशन कालावधी	जोडणीचा आकार इंचात	निवासी रु. प्रति वर्ष	व्यावसायीक रु. प्रति वर्ष
५	१३ ते १५ वर्ष	१/२	११०००	५५०००
		३/४	१७७००	८८५००
		१	४१४५०	२०७२५०
		१.५	१८१९५०	९०९७५०
		२	३०३१५०	१५१५७५०

		३	४८५०००	२४२५०००
		४	७२७५५०	३६३७७५०
		६	१२१२५००	६०६२५००
		८	१८१८८००	९०९४०००

अ.क्र.	कन्सेशन कालावधी	जोडणीचा आकार इंचात	निवासी रु. प्रति वर्ष	व्यावसायीक रु. प्रति वर्ष
६	१६ ते १८ वर्ष	१/२	१३७५०	६८७५०
		३/४	२२१५०	११०७५०
		१	५१८००	२५९०००
		१.५	२२७४५०	११३७२५०
		२	३७८९५०	१८९४७५०
		३	६०६२५०	३०३१२५०
		४	९०९४५०	४५४७२५०
		६	१५१५६५०	७५७८२५०
		८	२२७३५००	११३६७५००

अ.क्र.	कन्सेशन कालावधी	जोडणीचा आकार इंचात	निवासी रु. प्रति वर्ष	व्यावसायीक रु. प्रति वर्ष
७	१९ ते २० वर्ष	१/२	१७२००	८६०००
		३/४	२७७००	१३८५००
		१	६४७५०	३२३७५०
		१.५	२८४३००	१४२१५००
		२	४७३७००	२३६८५००
		३	७५७८००	३७८९०००
		४	११३६८००	५६८४०००
		६	१८९४५५०	९४७२७५०
		८	२८४१९००	१४२०९५००

परिशिष्ट - इ (शासन निर्णय)- स्वतंत्ररित्या सोबत जोडला आहे.

चर्चा :-

श्री.मीर हिदायत अली :जे रेग्यूलर भरतात त्यांचेकडूनच १८००रू घेतो ५० टक्के अनधिकृत नळ कनेक्शन आहेत २६ हजार कमर्शियल प्रॉपर्टी असतांना १०८० कमर्शियल नळ दिले कमर्शियल निवासी अनधिकृत नळ किती शोधले व लिगल केले अभय योजना नियमित चालू ठेवावी. रेग्युलाईज करण्यासाठी टाईम लिमीट दयावे त्यानंतर आढळून आल्यास पोलीसात कार्यवाही करावी जेथे घर तेथे कर लागला पाहिजे.केबलसाठी २५० महिणा लोक भरतात पाण्यासाठी ५० रू महिणा भरणे कठीण नाही. नळ कनेक्शन रेग्युलाईज होतील उत्पन्न वाढेल अशा पध्दतीने नियोजन

करावे.४५००रू पाणीपट्टी वाढीचा प्रस्ताव आणला आजही १८००रू एक दिवसाआड म्हणजे ६ महिणे पाणी देतो आज रोजीच ३६०० रू होतात जी पाणीपट्टी आहे ती योग्य आहे समांतर जलवाहिनी होईल त्यावेळी पाणीपट्टी वाढविण्यात यावी

श्री.त्रिंबक तुपे : कोणत्या निकषावर एवढी वाढ केली खुलासा घ्यावा.

श्री.समीर राजूरकर :जे भरतात त्यांचेवरच किती बोजा टाकणार मर्यादा असावी.चार बैठकीपासून कमर्शियल सर्वे करावा चर्चा होते आजपर्यत किती सर्वे केला रेकॉर्ड आहे का, निवासी कनेक्शनचा कमर्शियल वापर होतो त्याचेवर कार्यवाही न करता रेग्यूलर ३०-४० टक्के सामान्य नागरीक कर भरतात त्यांचेवर बोजा टाकण्याचा प्रयत्न होतो,हे योग्य नाही. सुचविलेली वाढ कशाच्या अधारे दिली

श्री.मुजीब खान :लिगल-अनधिकृत कमर्शियल, निवासी कनेक्शन किती सर्वे करण्याचे आदेशीत केले होते किती सर्वे केला माहिती घ्यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :नागरीक महागाईने त्रस्त आहे. पुणे ,अकोला नाशिक महापालिके प्रमाणे पाणीपट्टी असावी जास्त वाढ केल्यास नागरीकांचा रोष निर्माण होईल जास्तीची वाढ करण्यात येवू नये.

श्री.रेणुकादास वैद्य :जेथे निवासी तेथे कमीत कमी दर वाढ सुचवावी.कमर्शियल नळाला निवासी कर आकारतो अशी सद्या सिस्टम आहे एलबीटीच्या माध्यमातून चांगला डाटा तयार आहे.१५-१६ हजार कमर्शियल नोंद झाली त्यापैकी ५० टक्के कमर्शियल नळ झाले तरी असलेल्या संख्येच्या तुलनेत ८-१० पटीने वाढ होईल कमर्शियल नळाला निवासी टॅक्स आकारू नये त्यास सर्वे करून कमर्शियल नळपट्टी आकारावी सर्वसामान्यांना दिलासा देता येईल.

कार्य.अभियंता(पापू) :पाणीपुरवठयावर होत असलेला वार्षिक खर्च व पाणीपट्टी अधिक योजनेवरिल खर्च याचा मेळ घालून योजना स्वंयपूर्ण होण्यासाठी पाणीपट्टी किती असावी या बाबत शासनाने २ ऑगस्ट २०१० च्या जी.आर नुसार काही मार्गदर्शक तत्वे घालून दिली त्याचा आधार घेवून सर्व नगरपालिका महापालिका यांनी पाणीपुरवठा करीत असतांना किती खर्च होतो किमान ना नफा ना तोटा या प्रमाणे तरी पाणीपट्टी असावी या अनुषंगाने आदेशीत केले होते. त्यानुसार प्रशासनाने कॅल्क्युलेशन केले त्याप्रमाणे पाणीपट्टी किती असावी तसा प्रस्ताव ठेवला

श्री.मुजीब खान :नळ कनेक्शनचा सर्वे करण्याचा निर्णय सभागृहाने घेतला किती अमलबजावणी केली जे कर भरतात त्यांचेसाठी असे प्रस्ताव येतात. शासनाने म्हटले तर लगेच प्रस्ताव आणला.सर्वसाधारण सभेने सांगितले त्याचा उल्लेख नाही निवासी , कमर्शियल नळ किती तसेच वसुली किती सर्वे का केला नाही.

कार्य.अभियंता(पापू) : औरंगाबाद शहरात मालमत्ता व नळजोडणी व्यस्त प्रमाणात आहे. शहरात ३०-३५ टक्के भागात पाणीपुरवठा लाईन नाही त्यामुळे तेथील कनेक्शन गृहीत धरता येणार नाही.

श्री.संजय जोशी :कोणता भाग आहे पटकन सांगावे.

श्री.रेणुकादास वैद्य :महापालिका हद्दीत कुठे पाणी पुरवठा होत नाही.स्पेसिफिक नांव सांगावे.

श्री.गिरजाराम हळनोर :नवीन भागात लाईन झाल्यामूळे पाणी कमी पडते असे एकदा सांगितले गेले आता ३५ टक्के भागात पाण्याच्या लाईन नाही असे उत्तर मिळते हे बरोबर नाही.

कार्य.अभियंता(पापू) : माहिती मागविली आहे ५ मिनिटात दिली जाईल अनधिकृत नळ शोधून रेकॉर्डवर घ्यावे असे ठरले होते त्यानुसार ४ वेळेस अभय योजना राबविली दि.३-२-२०१० ते १५-२-२०१० या कालावधीत एकूण ४९५२ नळ कनेक्शन रेकॉर्डवर आणले निवासी नळ जोडणीचा १.५१ कोटी महसूल मिळाला कमर्शिलय कनेक्शन शोधण्यासाठी ९ पथके स्थापन केली त्यात २०१८ नळांचा सर्वे केला त्यात ४४४ वैध ४८४ अवैध आढळले.काहींकडे कनेक्शन नव्हते.पिठाची गिरणी, झेरॉक्स दुकान असेल तेथे कनेक्शन नव्हते.

श्री.सुशिल खेडकर :कार्य.अभियंता पापू यांनी कुठे जावून क्रॉस चेकींग केली

कार्य.अभियंता(पापू) :मी स्वत: पाहणी केली नाही त्यासाठी पथके स्थापन केली होती.

श्री.समीर राजूरकर :२०१८ कनेक्शनचा सर्वे कोणत्या भागातील केला.वार्डवाईज माहीती दयावी.

श्री.प्रमोद राठोड :२०१८ कमर्शियल मालमत्ता तपासल्या तर त्यात लिगल ,इलिगल किती.

कार्य.अभियंता(पापू) : ४४४ लिगल आढळले ४४८ लोकांकडे इलिगल कनेक्शन होते काहींनी वापरात बदल केलेला होता.

श्री.प्रमोद राठोड :संपूर्ण शहरात ४८४ मालमत्तेवर इलिगल कनेक्शन आढळले.प्रभाग वाईज सांगावे

कार्य.अभियंता(पापू) :२०१८ मालमत्ता १४-८-२०११ पर्यंत तपासल्या त्याचा हा तपशिल आहे. अ वार्ड मध्ये १६७ मालमत्ता तपासल्या अवैध-५५ अनियमित वापर असे ५५ कनेक्शन आढळले प्रभाग ड मध्ये ३५ आढळले , १०८० कनेक्शन रेकॉर्डवर आहे त्यात ४८४ नळाची भर पडेल.प्रस्ताव अगोदर दिलेला आहे मोहिम अगोदरपासूनच चालू होती.१४-८-२०११ पर्यतची ही माहिती आहे एक महिणा मोहिम चालू होती.

श्री.रेणुकादास वैद्य :एक महिण्यात किती मालमत्ता शोधू शकतो.

कार्य.अभियंता(पापू) :२०१८ कनेक्शन तपासले ४८४ अवैध होते. १०८० अधिक ४८४ एवढी कमर्शिलय नळाची संख्या झाली सर्वे अजूनही चालू आहे ४८४ कनेक्शन आपण रेकॉर्डवर आणले.

श्री.रेणुकादास वैद्य :एक महिण्यात किती नळ अभय योजनेतून लिगल केले.

कार्य.अभियंता (पापू) :दिनांक १४-७-२०११ ते १६-८-२०११ या एक महिण्यात वार्ड अ मध्ये ७० ड ,इ ३४७ कनेक्शन शोधले ,चार वेळेस अभय योजना राबविली ४९५२ इलिगल कनेक्शन सहा महिण्यात शोधले यातून १.५१,कोटी वसूल केले.दिंनांक ३-२-२०१०ते १५-२-१०, नंतर १६-८-१०-२०१० ते

३०-८-२०१० तसेच ९-५-२०११ते ११-५-२०११ व १४-७-२०११ ते १६-८-२०११ अशा चार वेळेस अभय योजना राबविली त्यात ४९५२ कनेक्शन शोधले.

श्री.मुजीब खान :एकूण मालमत्ता किती निवासी, कमर्शियल किती त्यात अधिकृत अनधिकृत किती संपूर्ण सर्वे करावा त्यानंतर हा ठराव यावा विचार करता येईल सर्वे करण्याचा निर्णय घेतला कार्यवाही केली नाही जे भरतात त्यांचेवर बोजा टाकला जातो.एकाला कर लागतो दुस-याला नाही असे न होता संपूर्ण सर्वे करावा ७५ टक्के नळ कनेक्शन इलिगल असावेत.

श्री.रेणुकादास वैद्य :सहा महिण्यात चार वेळेस मोहिम राबवून ५००० लिगल नळ कनेक्शन लिगल करून घेतले त्याबध्दल सर्व टीमचे अभिनंदन परंतु मालमत्ता व नळ कनेक्शनचे जे व्यस्त प्रमाण होते त्याप्रमाणे १.१० लक्षचे १.१५ लक्ष कनेक्शन झाले १३ लक्ष लोक संख्येचे शहर आहे साधारणतः मालमत्ता किमान ४ लक्ष असतील.

श्री.संजय जोशी :जनगणना २०११ नुसार एका घरात ५ या सरासरी प्रमाणे ३ लक्ष होतात.

श्री.रेणुकादास वैद्य :१.१५ लक्ष नळ कनेक्शन आहे. ५० टक्के इलिगल असतील ते शोधण्यासाठी मोहिम सहाच महिणे केली परंतु मोहिम कायमस्वरूपी राबवावी नेहमीसाठी एक पथक नियुक्त करावे.५५ टक्के नळ कनेक्शन बोगस आहे.आणखी १.१५ लक्ष कनेक्शन सापडतील अभियंत्याचे पथक नेमावे त्या कनेक्शनला लिगल करता येईल.

श्री.प्रमोद राठोड :शासनाचे या सोबत सर्व कागदपत्र दिलेले आहे.१८००रू.त महिण्यातून किती दिवस व किती वेळ पाणी देणे अपेक्षीत आहे.३० दिवस पाणी देणे अपेक्षीत होते ,का दिले नाही.

कार्य.अभियंता(पापू) :एक दिवसा आड पाणी देत असलो तरी योजनेवर खर्च जास्त होतो भविष्यात २४ तास पाणी दिले जाणार .१८००रू एक दिवसा आड पाणी देवू शकतो. पाणीपट्टीचे दर किती वेळा पाणी देतो यावर नसून खर्च किती होतो यावर ठरविले जातात.

श्री.प्रमोद राठोड :१८००रू घेतो तेवढे पाणी दिले जात नाही ३० दिवस पाणी दयायला पाहिजे.ही सेवा आहे देणे आवश्यक आहे.

श्रीमती फिरदोस फातेमा :५९५२ नळ कनेक्शन तपासले घेतले तेंव्हा कोणत्या बेसेसवर घेतले नोंद का नाही. १८००रू २० लिटर पाणी तर काही ठिकाणी सतत पाणी पुरवठा, पंप ऑपरेटर यांना पाणी बंद करण्याचे सांगावे लागते अशा वेळी २०० लिटर पाणी व्यक्तिला जाते जे टॅक्स भरतात त्यांचेसाठी वाढ होते मोठमोठया इमारतीमध्ये एक पेक्षा जास्त नळ कनेक्शन ,तेथे किरायदार असतात एकच मालमत्ता दाखविली जाते ५-६ कनेक्शन तेथे दुर्लक्ष होते कर्मचा-यांना माहित असते परंतु वरचेवर खर्च निघतो माहित नसल्याचे दाखवतात सर्वे करण्याचा निर्णय घेतला सहा

महिणे काम चालेल ६ महिणे सर्वे होत नाही आमचा कार्यकाळ निघून जाईल यादी समोर येणार नाही आदेशाचे पालन होत नाही.

श्री.सुशिल खेडकर :शोध मोहिमेत किती इंचीचे कनेक्शन शोधले.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :एका व्यक्तीला जे पाणी दयायचे तेवढा पुरवठा होतो का?

कार्य.अभियंता(पापू) :एका व्यक्तीला १३५ लि.पाणी दयायला पाहिजे त्यासाठी १९५ लि.पाणी उचलावे लागते तेवढे पाणी उचलू शकत नाही अनेक वेळा चर्चा झाली योजनेच्या मर्यादा असतात त्यात राहून १००लि. पाणी देतो

श्री.संजय जोशी :एका दिवसाला १३५ लि. पाणी दिले पाहिजे.

श्री.काशिनाथ कोकाटे :कशासाठी वाढ करायची खुलासा देण्याचा अधिकारी यांनी प्रयत्न केला जायकवाडी, हर्सुल तलावातून किती पाणी येते नळ कनेक्शन किती,त्यानुसार पाण्याचे प्रमाण आहे का,नसेल तर पाण्याचे ऑडीट करण्याची मागणी केली का ऑडीट करीत नाही १२५ एलएलडी पाणी येते ३०-३५ टक्के कनेक्शन इलिगल असल्याचे म्हटले ५० टक्के पाणी गळती होते याचा शोध लागत नाही.शासनाच्या परीपत्रकाचा अधार घेत ना नफा ना तोटा या तत्वावर पाणीपुरवठा करा असे म्हटले असले तरी काही भागात विनामुल्य पाणी दयावे असे म्हटले नाही.पाण्याचे ऑडीट करणेचा ठराव मंजूर केला ऑडीट केले नाही केले असेल तर कमर्शियल नळ किती अर्धा व पाऊन तसेच एक इंची कनेक्शन किती व याद्वारे किती पाणी देतो व येणारे पाणी किती याचा हिशोब काढू शकतो. तज्ञाकडून हिशोब काढावा किती गळती शहरात आहे हे कळेल.

कार्य.अभियंता(पापू) : ५० टक्के गळती होते हे मान्य केले आहे.पाण्याचे लेखापरिक्षण केले आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :१०० टक्के पाण्याचे ऑडीट व्हावे ठराविक जनतेनीच मालमत्ता कर व पाणीपट्टी भरायची काहींनी पैसे न भरता पाणी , सुविधा घ्यायच्या हे योग्य नाही दरवाढीला आमचा विरोध आहे. विरोध कायम राहणार आहे.

श्री.महेश मांळवतकर :सर्वे केला काही ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याचे म्हटले पीठाची गिरणी असेल तेथे सर्वे करण्याची गरज वाटते का आरोग्य सभापती यांनी कमर्शियल वापर असलेल्यांची यादी दिली त्याचा उपयोग घ्यावा कमर्शियल १००० रेकॉर्डवर दाखविले हॉटेल मध्ये पाण्याचा कमर्शियलच वापर होतो कोणता वापर होतो विचारण्याची गरज नाही असे हजारो व्यापारी आहेत तेथे किती इंचीचे कनेक्शन आहे शोधावे पाणीपट्टीत वाढ होणार याची मोठे व्यापारी अवैध नळ धारक, एक पेक्षा जास्त कनेक्शन असलेल्यांनी भिती बाळगली नाही ,जे वेळेवर कर भरणा करतात त्यांना धास्ती निर्माण झाली.जनगनणनुसार ३ लक्ष मालमत्ता धारक असू शकतात प्रत्येक घरात नळ आहेत त्यांना पाणी देणे आपली जबाबदारी आहे जे कर भरणा करतात त्यांना एक नळ व जे कर भरणा करीत नाही दादागिरीने अवैध नळ धेतात त्यांना मुबलक पाणी दिले हे योग्य

नाही एवढी दरवाढ एकदम करतो परंतु जे पाणी देतो त्याची वसुली करण्यामध्ये प्रशासन कुचकामी ठरते त्यामुळे सर्व सामान्यावर बोजा पडतो. कनेक्शन किती ,पाणी किती दिले जाते वसुली किती होते हे बघीतले पाहिजे जे अवैध कनेक्शन घेवून पाणी वापरतात त्यांचेवर काय कार्यवाही करणार ज्या मोहिम राबवितात त्या अधिकृत वसाहतीमध्ये भेदभाव होवू नये ९९ वार्डात मोहिम राबवावी.ज्यांना पाणी दिले जाते त्यांचेकडून पुर्ण वसुली करावी.स्वयंमुल्याकन कर आकारणी योजना राबवीत आहात जे कर भरणा करतात त्यांनाच फॉर्म वाटप होतात सर्वसामान्यांचा विचार व्हावा.

डॉ.नुझत तरन्नुम खॉन :सर्वे करतांना स.सदस्यांना विश्वासात घ्यावे. तसेच या विभागाचे पुर्ण कॉम्प्युटराईज करावे रेकॉर्ड वेळेवर सापडेल.वसुली बरोबर नाही.

श्री.सुर्यकांत जायभाये :सर्वे करतांना इलिगल सापडले तर त्यांचेवर ठोस कार्यवाही होत नाही.त्यामुळे पुन्हा कनेक्शन घेतात.कनेक्शन लिगल करून त्यांचेकडून दंड वसुल करावे अशा लोकांना महापालिकेची भिती नाही कमीत कमी करावे.

श्री.बाळासाहेब मुंडे :वार्डवाईज सर्वे करावा कोणत्या वार्डात इलिगल, कमर्शियल ,निवासी किती तसेच वसुली किती होते हे समजेल.

श्री.राजू शिंदे :दरवाढ कोणासाठी होत आहे खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पापू) :योजना तोटयात चालवू नये यासाठी दरवाढ होते भविष्यात संमातर जलवाहिनी होणार असून ठेकेदारास रक्कम दयावी लागणार त्यासाठी रक्कम उभी करावी लागणार हा उद्देश यामागे आहे.

श्री.राजू शिंदे : संमातर जलवाहिनीची निविदा आली त्यावेळी खर्च वाढणार दरवाढ करावी लागणार असे काहीही आले नव्हते ते दिले असते तर त्या विषयावर विचार करता आला असता.

कार्य.अभियंता(पापू) :समांतर जलवाहिची निविदा व याचा तसा काहीही संबध नाही.हे वाढीव येणारे पैसे महापालिकेचा पैसा आहे.

श्री.राजू शिंदे :यास स. पदाधिकारी व मा.आमदार हे सर्व मा.श्री.अजीतदादा पवार यांचेकडे गेले २१० कोटी माफ झाले १०० कोटी भरण्यासाठी दरवाढ केली की,समांतरचा खर्च वाढतो म्हणून दरवाढ केली योग्य उत्तर दयावे

कार्य.अभियंता(पापू) :मा.उपमुख्यमंत्री महोदय यांचे दालनामध्ये बैठक झाली त्या बैठकीत मा.प्रधान सचिव नगरविकास यांनी असे म्हटले की महापालिकेला जे ३११ कोटी थकीत रक्कम दयायची आहे तर २११ कोटी शासन माफ करण्यास तयार आहे त्यासाठी महापालिकेनेही काही सुधारणा कराव्यात पाणीपट्टी किती आकारली जाते अशी चर्चा झाली त्यावेळी मा.सचिव यांनी म्हटले की पाणीपट्टीचे दर फारच कमी आहे किमान जेवढा खर्च त्या प्रमाणे पाणीपट्टी असावी.

श्री.राजू शिंदे :चार महापालिकेचे पाणीपट्टीचे दर आहे सर्वात जास्त दर या महापालिकेचे आहे

कार्य.अभियंता(पापू) :इतर ठिकाणीची तुलणा येथे होणार नाही सोलापूर, पुणे, येथील महापालिकेची परीस्थिती वेगवेगळी असू शकते.

श्री.राजू शिंदे :जालना नगरपालिकेची परिस्थिती सुध्दा वाईट आहे त्यांचे दर व येथील दरात मोठा फरक आहे.

कार्य.अभियंता(पापू) :कोणत्या महापालिकेने किती दर लावावे हा त्यांचा अधिकार आहे.

श्री.राजू शिंदे :दरवाढ कोणासाठी कोणाच्या सांगण्यावरून केली खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पापू) :पार्श्वभुमी सांगितली हा प्रस्ताव यापूर्वीच यायला पाहिजे होता.

श्री.राजू शिंदे :दररोज प्रत्येक व्यक्तीला १३५,की ३५ लि.किंवा किती पाणी मिळते हे मा.प्रधान सचिव यांना माहित नाही जे लोक नियमित कर भरतात त्यांना १८००रू म्हणजे ३६००रू पाणीपट्टी आहे. ४५०० केल्यास ती ९०००रू होते. कारण सहा महिण्याचे १८००रू भरतात त्यातही ५०-६० दिवस लाईन फुटली, लाईट नव्हती, इतर कारणामुळे पाणी दिले जात नाही याचा अर्थ ४ महिणे पाणी देतो त्यापोटी करदात्यांना १८०० रू भरावे लागतात.४५००रू पाणीपट्टी करणार असेल तर सहा महिण्याप्रमाणे दररोजचे २५रू पाणीपट्टीसाठी मोजावे लागणार आहे.असे असतांना १३५ लि.प्रति व्यक्ती पाणी देत नाही.५० लि.पाणी सुध्दा काही ठिकाणी मिळत नाही.

कार्य.अभिंयंता(पापू) :१०० लि. पाणी एका व्यक्तिला देतो. एव्हरेज मध्ये मोजले जाते.काही ठिकाणी १५० व जास्तही मिळत असेल.

श्री.राजू शिंदे : १२ते १३ लक्ष शहराची लोकसंख्या जर १२०-१३० एमएलडी पाणी येत असेल तर प्रत्येक व्यक्तीला दररोज १३०लि पाणी मिळायला पाहिजे दिवसा आड पाणी म्हणजे ६ लक्ष लिटरच पाणी दिले जाते उर्वरीत ६ लक्ष लि.पाणी कुठे लिकीज होते नांदेड महापालिकेत ४१००० निवासी कनेक्शन ,१५००रू एक वर्षाची पाणीपट्टी ,दररोज ११० प्र.व्यक्ती पाणी दिले जाते.कमर्शियल संख्या २५०० आहे अहमदनगर महापालिकेत ४१२६० निवासी कनेक्शन , १५०० वार्षीकपट्टी ,कमर्शियल ३४७३ आहेत.येथेही दररोज पाणी मिळते.अहमदनगर महापालिकेत ३४७३ कमर्शियल कनेक्शन असू शकतात तर या महापालिकेत निवासी कनेक्शनच्या तुलनेत १० टक्के म्हणजे किमान ११००० कमर्शियल कनेक्शन असायला पाहिजे १०८० कनेक्शन रेकॉर्डवर .२० टक्के प्रमाणे २५ हजार कमर्शियल कनेक्शन असायला पाहिजे दरवाढ करण्याची गरज नाही उलट १५००रू पाणीपट्टी केली पाहिजे अधिकारी निष्क्रीय आहेत जाहीर करा ,अनधिकृत नळ शोधू शकत नाही. प्रशासनाने जाहीर करावे आम्ही नागरीकांना समज काढू की अधिकारी काम करीत नाही म्हणून पाणीपट्टी वाढ झाली.एखादया कंपनीचे प्रोडक्शन कमी असेल तर ते जास्त करण्यासाठी कॅपीसीटी वाढवावी लागते कमी पैशात जास्त माल देवू शकतो.सर्वसामान्य नागरीकावर ही दरवाढ लादणार आहे.समांतरची निविदा मंजूर करतांना दर ३ वर्षानी २५ टक्के वाढ होणार आहे १८००रू वर २५ टक्के दर ३

वर्षानी वाढ केल्यास किती रक्कम होते,२५ टक्के प्रमाणे ४५०रूनी वाढ ही ३ वर्षानंतर २२५०रू पाणीपट्टी व्हायला पाहिजे.

कार्य.अभियंता(पापू) :दोन मुद्दे एकत्र होत आहे समांतर जलवाहिनी निविदा स्थायी समितीसमोर दिली त्यामध्ये पुर्ण स्टेटंमेंन्ट दिले दर ३ वर्षानी वाढ होईल सर्वसाधारण सभेचीच मान्यता आहे शंका नको,जी रक्कम पाणीपट्टीतून वसुल होणार ती त्या विकासकाला देणार आहोत.

श्री.राजू शिंदे : समांतर जलवाहिनीचे मंजूर केले त्यात अट क्र.५ मध्ये दिले यानुसार २० वर्षाचा कालावधीमध्ये पाणीपट्टीचे दर वाढविण्यास सर्वसाधारण सभेने ठराव क्र.५५४ दिनांक १८-.८-२००९ अन्वये मान्यता दिली त्यानुसार पुढील २० वर्षाकरीता पाणीपट्टीचे दर अंतीम केलेले आहे योजना कार्यान्वीत झाल्यानंतर हे दर अंमलात येतील दर ३ वर्षानी २५ टक्के वाढ होणार असे यात दिले. असे असतांना ही दरवाढ कशासाठी.

कार्य.अभियंता(पापू) :जो गॅप निर्माण झाला ती रक्कम महापालिकेलाच मिळणार आहे.

श्री.राजू शिंदे :४५००/-रू दरवाढ होणार त्यावर ३ वर्षानी २५ टक्के वाढ होणार असेल तर योग्य नाही.

श्री.त्रिंबक तुपे :स्पष्ट खुलासा प्रशासनाकडून व्हावा.

श्री.गिरजाराम हळनोर :१८००रू किती वेळ व किती लि पाणी देतो योजनेवर होत असलेला खर्च त्यानुसार घेतो का, इतर महापालिकेतील पाण्याचा खर्च व येथील खर्च याची तुलना करा,

श्री.राजू शिंदे : २००५ मध्ये एका नळासाठी ३३००रू खर्च येत होता अगोदरपासूनच योजना तोटयात होती चालू होती ७ वर्षानंतर दरवाढ करण्याची जाग आली १०टक्के दरवर्षी वाढ केली असती तर एवढा बोजा पडला नसता. १८००रू वर २५ टक्के प्रमाणे ४५० वाढ झाली असती ४५००रू वर २५ टक्के वाढ केल्यास ११२५रू होतात त्यातून ४५० वजा केल्यास ६७५रू जे शिल्लक राहतात ते त्या एजन्सीला प्रत्येक कनेक्शनमागे किमान एक लक्ष कनेक्शन गृहीत धरले तरी ६.७५ कोटी रक्कम एसपीएमएल ला मिळणार आहे.१८००रू वर २५ टक्के वाढ का होत नाही.

कार्य.अभियंता(पापू) :एसपीएमएल ला किती पैसे मिळणार ऑलरेडी रेकॉर्डवर दिले योजना पुर्ण झाल्यानंतर २५ टक्के वाढ होणार आहे.

श्री.राजू शिंदे :प्रशासन कमर्शियल नळ शोधू शकत नाही नाशिक महापालिकेचे दर आहे,नगरपरीषद, नगरपालिका या महापालिकेपेक्षा चांगले काम करतात असे वाटते.येथेच काम करणारे अधिकारी वरिष्ठ झाले सर्व माहिती असतांना महापालिकेची परीस्थिती सुधारता येत नसेल तर नगरीपालिकेप्रमाणे आकडेवारी देत असेल पुढे जाण्या ऐवजी आपण मागे जातो यास नगरसेवक ,नागरीक जबाबदार नसुन अधिकारी जबाबदार आहे सभागृहाची भावना चांगली असते त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही कामाची कार्यक्षमता वाढली पाहिजे सहा महिण्यात २०१८ कनेक्शन सर्वे केला १.०४ कोटी मिळाले त्यात ४४४ इलिगल सापडले,

१ लक्ष मालमत्तेचा सर्वेसाठी १६ वर्ष लागतील १० वर्ष आपण मागे जात आहे.एमएसईबीचे २.५० लक्ष कनेक्शन आहे जीटीएल कपंनीचे दर व त्यानुसार महिण्याला उत्पन्न वाढते.त्याप्रमाणे सर्वे केला तर किमान १० टक्के कमर्शिल याचा अर्थ ११ हजार कमर्शिलय नळ असेल, त्यातून मोठे उत्पन्न मिळेल त्याकडे लक्ष न देता जे कर भरतात त्यांचेवर बोजा टाकणार दरवाढ केल्यास कोणीही नागरीक पैसे भरण्यासाठी येणार नाही आजपर्यत डिमांड पोहचल्या नाही नागीकांनी पैसे भरावे ही अपेक्षा कशासाठी बोगस सिस्टम झाली त्यामूळे सदस्यांना नागरीकासमोर जाता येत नाही.दररोज महापालिकेच्या वेगवेगळया बातम्या पेपरला येतात यात महापालिकेची मोठी बदनामी होत आहे.

कार्य.अभियंता(पापू) :यानंतर दर दोन महिण्यानी वसुली करणार १८ कोटीच्या डिमांड नोटीसची कार्यवाही होत आहे.

श्री.राजू शिंदे :डीमांड वाटप करणार नाही वसुली करणार नाही दरवाढ करणार हे जे भरतात त्यांचेवर बोजा टाकणार हे कितपत योग्य

कार्य.अभियंता(पापू) :वसुलीसाठी विशिष्ट यंत्रणा उभी करीत आहोत.

श्री.राजू शिदें वयोवृध्द,निवृत्त नागरीक ,किंवा ज्यांची पैसे भरण्याची इच्छा आहे त्यांना डिमांड नोटीस नाही तर कर कसे भरतील या विभागाची सिस्टम सुधारण्याचा अनेकदा प्रयत्न करून सिस्टम सुधारत नाही सिस्टम सुधारण्यासाठी पुन्हा प्रयत्न करावे कमर्शिलय १० टक्के नळ शोधावे मोठे उत्पन्न येईल.दरवाढ केली तर कोणीही कर भरणार नाही. कारण नागरीकांना वेळेवर व स्वच्छ पाणी मिळत नाही इतर महापालिकेत १५००रू यात दररोज पाणी मिळते येथे १८००रू.त ६ महिणेच पाणी दिले जाते

कार्य.अभियंता(पापू) :सिस्टममध्ये खर्च किती त्यानुसार पाणीपट्टी आकारली जाते.सिस्टम सुधारण्यासाठीच पी पी पी मॉडल तयार केले .

श्री.राजू शिंदे :२००५ मध्ये ६२५ कमर्शियल कनेक्शन होते ५ वर्षात फक्त ४०० कनेक्शन शोधले एलबीटीचे २ महिण्यात १५००० हजार नोंद होते तर ६ महिण्यात पाणी पुरवठा विभाग २००० कनेक्शचा सर्वे होतो मोठी तफावत आहे प्रत्येकाच्या काम करण्यावर सर्व असते सिस्टम सुधारावी किती दिवसात कमर्शिलय नळ शोधणार सांगावे नसंता काम करण्यास हा विभाग निष्क्रीय आहे प्रशासनाने जाहिर करावे आमचा यास विरोध असणार नाही प्रशासन निष्क्रीय आहे वाढ करावी लागली असे नागरीकांना उत्तर देता येईल.

कार्य.अभियंता (पापू) :कमर्शिलय नळ शोधले तरी सिस्टीमच्या खर्चाचा लॉस भरून निघणार नाही आरोग्य विभागाचा तसेच एलबीटीचा डाटा घेवून कमर्शिलय नळ शोधले जातील.

श्री.रेणुकादास वैद्य :एमएसईबीचे बील प्रत्येक घरात जाते मालमत्ताचे स्वत:हून डिक्लेर करावे अशी घोषणा केली तसेच नळ पट्टी बाबत प्रत्येक लाईटबील बरोबर टॅब करून फॉर्म दिला तर १.१५ लक्ष वाढीव नळ कनेक्शन

निदर्शनास येतील जे १०० कोटी भरणा करायचे तेवढी रक्कम वसूल होईल ५५ टक्के वसुलीत भर पडेल पाणीपट्टीची वाढ करण्याची गरज पडणार नाही. परंतु हे करण्यासाठी प्रशासनाची मानसीकता असायला पाहिजे.आतापर्यत डाटा घेवून कार्यवाही का केली नाही.

श्री.राजू शिंदे :स.सदस्य श्री. वैद्य यांनी जे मत माडंले तेच माझे मत आहे विकास कामे केली नाही उलट दरवाढ केली नागरीक फिरू देणार नाही.

श्री.बाळासाहेब मुंडे :स्वंयमुल्यांकन साठी विदयार्थीची मदत घेत आहोत त्याप्रमाणे प्रत्येक वार्डात नळ शोधण्यासाठी मदत घ्यावी

श्री.राजू शिंदे : ५० टक्के वेळ पाणीपुरवठयाच्या सिस्टीमवर दिला तर ही सिस्टम सुधारेल. किमान १० टक्के नळ कमर्शिलय हे लिगल करून तेवढी वसुली केली तर किमान २०००-२५०० रू पर्यंत पाणीपट्टीची फिगर मॅच होईल.

श्री.मुजीब खान :एक धोरण ठरवावे की किती कमर्शियल नळाचा सर्वे करून प्रशासन सादर करणार सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली असली तरी प्रशासन मनमानी करू शकत नाही

श्री.राजू शिंदे :किमान १० टक्के कमर्शिलय नळ किती दिवसात शोधणार प्रशासनाने सांगावे शोधणार असेल तर हा प्रस्ताव स्थगित ठेवावा हे काम प्रशासनाकडून होत नसेल तर तसे सांगावे त्यावर किती वाढ करायची सभागृह ठरविल.

श्री.मुजीब खान :प्रस्ताव स्थगित ठेवावा .एक धोरण ठरवावे प्रशासनाला टाईमलिमीट दयावे तरच काम होईल नळ शोधण्यास स.सदस्यही मदत करतील त्यानंतर प्रस्ताव यावा किती वाढ करायची सभागृह निर्णय घेईल.

श्री.विरभद्र गादगे :चर्चा होते काम करण्याच्या पध्दती ठरल्या जातात अमलबजावणी होत नाही संबधीत विभागाने १२ तास ऐवजी ६ तास काम केले तरी एवढे बोलण्याची वेळ येणार नाही चर्चा अधिकारी सहजतेने घेतात याला अर्थ नाही जनतेने आम्हाला निवडुन दिले कामे व्हायला पाहिजे अधिका-यांना संपर्क साधला असता एक दुस-याचे नाव सांगतात काही तरी जबाबदारी समजून अधिका-यांनी काम करावे नुसती चर्चा करायची सभा संपणार आपण निघून जाणार याला अर्थ नाही. अधिका-यांनीच त्यांचे खालचे कर्मचा-याकडून कसे काम करून घ्याचे ते ठरवावे.कामे होणार की नाही खुलासा करावा.

श्री.त्रिंबक तुपे :५० टक्के गळती होते प्रशासनाने मान्य केले. लिकिजेस, अनधिकृत नळ, पाण्याची चोरी हे सर्व त्यात येते.९० टक्के पाणी आले असते तर १८००रू पेक्षा कमी पाणीपट्टी आपण घेवू शकतो.सदस्यांच्या भावना योग्य आहे.अनधिकृत नळ किती, कमर्शिलय किती यादी दिली कार्यवाही होत नाही.शहर वाढते पाणी टंचाई निर्माण होते काही प्रमाणात वाढ करणे आवश्यक हे सभागृहालाही कळते परंतु प्रशासनाची दुसरी बाजू कमकुवत आहे.नेहमी सांगूनही अनधिकृत नळ शोधू शकत नसेल तर नागरीकावर दरवाढ करण्याचा हक्क पोहचत नाही अभय

योजनेच्या माध्यमातून ५ हजार कनेक्शन शोधले असे म्हटले परंतु कॅम्प लागतात तेव्हा स.सदस्यांना अधिकृत नळ करून घेण्यासाठी प्रयत्न करावे लागते आमच्या प्रयत्नातून हे नळ लिगल झाले अनेक ठिकाणी अनधिकृत कनेक्शन असल्याचे आम्ही प्रामाणिकपणे सांगतो.सर्व सदस्य प्रशासनाला मदत करतात वारंवार विषय समोर येतो.नागरीकांच्या भुमिकेपेक्षा माहापालिकेची भुमिका आम्ही जास्त विचारात घेतो उत्पन्न वाढले तर कामे होतील हा विचार आम्ही करतो शहरात अनेक ठिकाणी लॉनस् ,हॉटेल, गॅरेज, बेकरी आहेत असे असतांना १०८० कमर्शिलय नळ रेकॉर्डवर आहे अनेक ठिकाणी १०० टक्के वापर कमर्शियल आहे.कमर्शिलय नळ शोधले तर त्यामूळे जी उत्पन्नात वाढ होणार त्यानंतर आज जी दरवाढ केली कमी होणार का,पाणीपुरवठा सुरळीत नाही १५ दिवस पाणी सुरळीत मिळाले आज पुन्हा पुर्वीसारखी परीस्थिती झाली.दरवाढ होणार असेल तर नागरीकांनाही पुर्णवेळ पाणी मिळालेच पाहिजे.लाईट नसते टाक्या भरल्या जात नाही यामुळे अनेकदा पाणी येत नाही १-१ वाजेपर्यंत पाणी चालू असते. १० नंतर पाणी येणार नाही असे सांगितले गेले माझ्या वार्डात ११ च्या नंतर पाणी येते हा प्रकार बंद झाला पाहिजे अशाने नागरीक पैसे भरणा करणार नाही २१ कोटीची मागणी असतांना ६-७ कोटी वसुली होते बाकी वसुली का होत नाही मोठया प्रमाणात गळती असतांना आजची परीस्थिती पाहता मोठया प्रमाणात दरवाढीचा प्रस्ताव आणला आहे ही दरवाढ मान्य नाही.योग्य ती वाढ करून निर्णय घ्यावा.

श्री.प्रमोद राठोड :उत्पन्न वाढवावे ही आमचीही भुमिका आहे, दरवाढ करून जनतेचा रोष घेवू नये पाणीपट्टीत वाढ करू नये वाढ करण्यास आमचा पुर्ण विरोध आहे

सौ.रेखा जैस्वाल :मुबलक पाणी दिले तर दरवाढ करण्याचा अधिकार वाटतो. ६ महिणे पाणी दिले जाते त्यात एक महिणा या ना त्या कारणाने पाणी नसते ५ महिणेच पाणी येते पाणीपट्टीचे दर कमी असल्याचे मा.प्रधान सचिव यांनी म्हटले ,प्रस्ताव दिला परंतु येथील परीस्थिती शासनाला माहित नाही उत्पन्न वाढवावे सर्वांचे मत आहे परंतु पाणीपट्टीत वाढ करणे हा एकमेव पर्याय नव्हे.पाणी ही पहिली गरज आहे त्याची दरवाढ करण्यास सोपे वाटते होर्डीग, टावर्स, सामाजिक सभागृह यांचे माध्यमातून उत्पन्न वाढवू शकतो त्यातून कार्यवाही करावी.पाणीपट्टीत वाढ करू नये.त्यास आमचा विरोध आहे.

श्री.मीर हिदायत अली :पाणी सोडणारे लाईनमन मार्फत डोअर टू डोअर सर्वे करावा ती माहिती कार्य.अभियंता यांचेकडे घ्यावी त्यानुसार त्या वार्डाचे स.सदस्य त्या नागरीकांना बोलवून नळ रेग्यूलाईज करण्या बाबत सांगतील यामुळे उत्पन्नात वाढ होईल दरवाढ करण्याची गरज नाही.

श्री.समीर राजूरकर :मा.सभापती पोटतिडकीने बोलले केंव्हा ११ हजार नळ कनेक्शन शोधणार का ,खुलासा घ्यावा.

मा.आयुक्त :हा संवेदनक्षम विषय आहे सर्वाच्या भावना वेगवेगळया आहे.इलिगल नळ कनेक्शन मोठया प्रमाणात असल्याच्या भावना व्यक्त केल्या, रास्त मुद्या आहे.त्या बाबतीत जी कार्यवाही होणे आवश्यक होते ती झालेली नाही जणगननेनुसार शहरात २.४० लक्ष कुटूंब आहे त्यात व्यावसायिक ही असतील एलबीटीचे रजिस्ट्रेशन १७ हजार केले २.४० लक्ष मध्ये फक्त १.५० लक्ष कुटुंबाना निवासी कर तीच परीस्थिती या बाबतीत आहे १ लक्ष पुर्वीचे व २ वर्षात जे शोधले असे १.०५ लक्ष नळ आहे.अनेक लोकांकडे इलिगल कनेक्शन आहे हा मुद्या रास्त आहे.हे दूर करण्यासाठी दोन वर्षात ४ वेळा अभय योजना राबविली सर्व यंत्रणा कामाला लावलेली आहे लाईनमन पासून सर्व कर्मचारी कामाला लावले बैठका झाल्या हेही तितकेच खरे आहे.पहिल्यांदा व्यावसायिक नळ कनेक्शन शोधण्याचे सांगितले होते ते नळ तोडण्याचा प्रयत्न केला काहींना मारहाण झाली.पोलीस संरक्षण ही दिले कार्यवाही केली नाही असे नाही,परंतु जेवढी कार्यवाही व्हायला पाहिजे तेवढी झाली नाही.आउटपुट फारसे निघाले नाही असे लक्षात येते की जवळपास १ ते दीड लक्ष कनेकशन असावेत यातील १५-२० हजार निश्चितच कमर्शियल असले पाहीजेत यातही दुमत नाही. व्यावसायिक नळ शोध उदयापासून कार्यवाही सुरू होत आहे.आकडेवारी बघीतली तर जी दरवाढ करणार त्यास कारण आहे.पाणी खर्च बघीतला तर १००० लि.मागे ११रू खर्च आहे मुंबई महापालिकेत तोच खर्च ८ रू आहे तर नाशिक महापालिकेत ४.५०रू तर पिंपरी-चिंचवड महापालिके ४.७५ रू तर नांदेड महापालिकेत ७रू आहे हा हिशोब बघीतला तर येथे जवळपास ११रू आहे ५ ठिकाणी पाणी लिफ्टींग करून पाणीपुरवठा हा ग्रॅव्हेटीच्या विरूध्द असल्यामूळे मोठा खर्च आहे.तो कमी केला पाहिजे एंकदरीत उत्पन्नच अडचणीचे आहे.जकात बंद झाली एलबीटी चालू केली चांगले उत्पन्न येते.त्याच बरोबर घरपट्टी , नळपट्टी नगररचनाचे उत्पन्न असेल हे वाढविण्याची गरज आहे.उत्पन्न वाढविण्याचा एक भाग म्हणून काही तरी दरवाढ करायला पाहिजे दुमत नाही. पाणीपट्टी प्रमाणे इतर दरवाढ प्रस्तावित करीत आहोत.उत्पन्न ही बाब महत्वाची आहे. पाण्यावर वर्षात ५० कोटी खर्च होतो.१० टक्केनी दरवर्षी वाढ होते.नवीन योजनेसाठी ६३ कोटीचा खर्चही वाढलेला आहे.या वाढत्या खर्चाचा ताळमेळ कसा घालायचा वसुलीचे आकडेवारी बघीतली तर सन २००९-१० या वर्षात १७ कोटीची वसुली झाली त्यात चालू व थकबाकी आहे.सन २०१०-११ मध्ये १६.२३ कोटी मिळाले डिमांड १८ कोटीची व खर्च ६० कोटीचा होत आहे त्यासाठी अनधिकृत कनेक्शन शोधणे ,कमर्शियल कनेक्शण शोधणे व पाणीपट्टीत वाढ करणे याशिवाय मार्ग नाही असे वाटते.अनधिकृत नळ शोधण्याचे प्रयत्न उदयापासून करणार आहोत.यंत्रणा कमी आहे हेही बरोबर आहे. राज्य व केंद्र शासनाकडून समांतर जलवाहिनीसाठी निधी आला त्याच प्रमाणे इतर जे प्रोजेक्ट

करायचे आहे व त्यासाठी शासनाचा निधी मागवायचा त्यावेळी हे दाखवायचे की जेवढा खर्च होतो ते पैसे उपलब्ध करून घेतो आहोत.रिफॉर्मस् म्हणून हे करणे गरजेचे आहे. कारण शासन जेंव्हा निधी देते त्यावेळी रिफार्मस् काय केले विचारणा होते.देत असलेल्या सेवा किती चांगल्या आहे हे बधीतले जाते त्या सेवा चांगल्या नसेल तर शासन निधी देणार नाही.अडचणी निर्माण होऊ शकते म्हणून हे सर्व करण्यासाठी पाणीपट्टी वाढविणे आवश्यक आहे त्यासाठी प्रस्ताव दिला.

श्री.मुजीब खान :जो खुलासा केला याची कल्पना सदस्यांना आहे. परंतु केलेली वाढ व अनधिकृत कनेक्शन शोधल्यानंतर येणारे उत्पन्न यामध्ये कितीचा फरक येत आहे त्यानुसार किती दरवाढ करणे आवश्यक आहे हे पहावे ५५-६० टक्के खर्च होतो मान्य आहे जी वसुली आहे इलिगल शोधणे, दंडात्मक कार्यवाही करून सर्व समोर आणावे आता वाढ केल्यास जे भरतात त्यांचेवर अन्याय होईल,सर्वेचे काम का होत नाही दरवाढ केली तर प्रशासन ६ महिण्यात सर्वे करून देणार काय ,अनेक जुन्या इमारतीच्या जागेवर कॉम्प्लेक्स झाले त्यांना पुर्वीचाच टॅक्स आहे सर्वे करून आणावा त्यानुसार किती तफावत येते तेवढी दरवाढ करता येईल.

श्रीमती प्रिती तोतला :दरवाढ केल्यास आर्थीक स्थिती सुधारेल हे सत्य असले तरी आताच म्हटल्याप्रमाणे १ हजार लि. पाणी लिफ्टींगचा खर्च ११रू आहे परंतु माझे वार्डात एका ठिकाणाहून एक वर्षापासून शेकडो लि.पाणी वाया जाते अनेकदा संबधीत अधिकारी यांना माहिती दिली कार्यवाही केली नाही शहरातील असे गळती होणारे पाणी आधी बंद करावे त्यासाठी होणारा लिफ्टींगचा खर्च वाचेल.

श्री.प्रमोद राठोड :अनेकदा उपत्न वाढी संदर्भात चर्चा झाली.त्यासाठी इतर साधने आहेत वार्डात वेळेवर व एकदिवसाआड सुध्दा पाणी मिळत नाही.असे असतांना दरवाढ करणे चुकीचे आहे ज्या वेळेस .समांतर लाईन होईल तेंव्हा २४ तास पाणी मिळेल असे म्हटले होते पुर्ण वेळ जेंव्हा पाणी येईल त्यावेळी दरवाढ करावी दरवाढीस आमचा विरोध आहे.

श्री.नासेरखॉन :आताच स.सभापती यांनी पाणीपट्टी वाढी बाबत सविस्तर बोलले, संबधीत अधिकारी यांनी उत्तर बरोबर दिले नाही.दरवाढ करण्यास विरोध नाही परंतु अनधिकृत कनेक्शन लिगल किती केले माहिती मिळत नाही. २-३ दिवसापासून महापालिकेच्या वेगवेगळया बातम्या येतात. अधिका-या विषयी पेपरला येते याचा अर्थ आपण सर्वच कुठेना कुठे दोषी आहोत. सर्वांनी मिळून काम केले .५ वर्षात यंत्रणा कमी पडली नाही याच वर्षी का पडली,आज दरवाढ करणार पुन्हा ३ वर्षानी २५ टक्के वाढ होणार असेल तर योग्य नाही .महापालिकेची बदनामी होईल असे काम होवू नये दरवाढ करण्यास माझा विरोध आहे.

सौ.साधना सुरडकर :एकीकडे आपण निष्काम जन सेवाये समर्पिता असे म्हणतो ही व्यावसायिक संस्था नाही. पाणी हा विषय सर्वांच्या जिव्हाळयाचा विषय आहे त्यातच नागरीकांना वेठीस धरतो प्रामाणिकपणे जे कर भरतात

त्यांचेवर लादतो पाणी वेळेवर देतो का जे १०० टक्के कर भरणा करतात त्यातील काही नागरीक हातपंपाचे पाणी वापरतात पिण्यापूरते नळाचे पाणी मिळते. वेळेवर पाणी दिले जात नाही, असे असतांना कोणताही विचार न करता जे कर भरणा करतात त्यांचेवर बोजा टाकण्याचा प्रयत्न होतो उत्पन्न मिळविण्याचे इतर साधने आहेत त्यातून उत्पन्न वाढवावे पाणीपट्टीत वाढ करू नये.

मा.महापौर :सर्व सदस्यांच्या भावना लक्षात धेवून सर्वसाधरण नागरीकांच्या निवासी वापरामध्ये असलेल्या अर्धा इंच नळाच्या पाणीपट्टीमध्ये सुचविलेली ४५०० रू वाढ ही खुपच जास्त होते सध्या एका नळामागे १८००रू ची आकारणी होते त्याऐवजी २५००/- रू आकारण्यात यावे ७००रू ची वाढ करण्यात येते इतर घरगुती वापराच्या जोडणीमधील वाढ प्रशासनाने सुचविलेली अमान्य असून सध्याच्या दरानुसार ३५टक्के सरसरकट करण्यात येते.

(याच वेळी डायस समोरील राजंदड काही संदस्य उचलतात अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

इलिगल नळ शोधून मोहिम योजना राबवून नळ नियमित करावे तसेच व्यावसायिक नळ शोध मोहिम प्रभावीपणे राबवावी जे व्यावसायीक आहे त्यांना व्यावसायिक दरानेच नळपट्टी आकारावी पाण्याची गळती थांबविण्या बाबत परिणामकारक उपाययोजना कराव्यात पाण्याचे ऑडीट करावे १० हजार नळ कमर्शियल शोधून सादर करावे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक आणि पर्यटन दृष्टया महत्वाचे शहर असून हे शहर मराठवाड्याची राजधानी आहे. या शहरात औद्योगिक प्रकल्प मोठया प्रमाणात आहेत त्याच प्रमाणे मोठमोठे औद्योगिक प्रकल्प या शहरात नव्याने येत आहेत. अनेक शैक्षणिक संस्था आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळे या शहराचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. शैक्षणिक, औद्योगीक, सांस्कृतिक, वैद्यकीय सेवा सुविधा आणि पर्यटन स्थळांमुळे या शहराची झपाट्याने वाढ होत चालली असून आजुबाजूचे जिल्हे/परिसरातुन मोठ्या प्रमाणात लोक या शहरात स्थलांतरीत होत आहेत. परिणामी नवनविन वसाहती उदयास येत आहेत. यासाठी पाणी पुरवठ्याचे योग्य नियोजन व पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यासाठी पाणीपट्टीची वसुली परिणाम कारक व सक्षम रित्या होणे आवश्यक आहे. अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती व संचलना करीता औरंगाबाद महानगरपालिकेला साधारणत: रुपये ५० कोटी वार्षीक खर्च होतो.

सन २००३ नंतर आज पर्यंत पाणीपट्टीच्या दरांमध्ये कुठलीही वाढ न केल्यामुळे पाणीपट्टीची मागणी व योजनेवर होणारा खर्च यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत असूनही महानगरपालिकेने पाणीपट्टीच्या दरात वाढ केलेली नाही. परिणामत: महानगरपालिकेला मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे.

नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन यांचा क्र. संकिर्ण-२००९ /प्र.क्र.२०७/०९/ न.वि.२० दिनांक ०२ ऑगस्ट २०१० नुसार महानगरपालिकेतर्फे राबविण्यात

येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती कार्यक्षम तसेच योजना आर्थिक दृष्ट्या स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने पाणीपट्टीचे दर अंमलात आणण्यासाठी मार्गदर्शक तत्वे विहित केली असून तद्नुषंगाने कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या पीपीपी तत्वावरील समांतर पाणी पुरवठा योजनेच्या निविदा अटी व शर्ती नुसार Concession Period -२० वर्षे आहे. या अंतर्गत विकासकाला पहिल्या वर्षी रुपये ६३ कोटी Annual Operational Support Grant (AOSG) म्हणून द्यावयाची असून पुढील २० वर्षांपर्यंत सदर AOSG ची रक्कम प्रत्येक वर्षी ६% ने (Escalate) वाढणार आहे. महानगरपालिकेस राबवावयाच्या बंधनकारक (Mandatory) सुधारणा अंतर्गत दिनांक ०२ ऑगस्ट २०१० च्या शासन निर्णयानुसार पाणीपट्टीमध्ये दरवाढ केल्यास पाणीपट्टी पोटी मिळणारी वाढीव (फरकाची) रक्कम महानगरपालिकेस मिळणार आहे. यामुळे विकासकाला AOSG ची रक्कम वेळेवर देणे महानगरपालिकेस सुकर होईल.

या प्रकरणी सभागृहात झालेल्या सविस्तर चर्चेनुसार खालीलप्रमाणे पाणीपट्टींच्या दरांमध्ये वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

१. अर्धा इंची व्यासाच्या रहिवासी / घरगुती नळ जोडणीसाठी पाणीपट्टीच्या दरात रुपये १८००/- प्रति वर्ष वरुन रुपये २५००/- प्रति वर्ष प्रमाणे वाढ मंजुर करण्यात येते.

२. अर्धा इंच व्यासापेक्षा मोठ्या व्यासाच्या सर्व रहिवासी नळ जोडण्यांसाठी सध्या अस्तित्वात असलेल्या पाणीपट्टीच्या दरांपेक्षा ३५% प्रमाणे वाढ मंजुर करण्यात येते.

३. सर्व व्यावसायिक नळ जोडण्यांसाठी आता नव्याने वाढविण्यात आलेल्या रहिवासी पाणीपट्टीच्या दरांपेक्षा ५ पट वाढीस मंजुरी देण्यात येते.

४. मीटरसह असलेल्या रहिवासी नळ जोडण्यांकरीता रुपये ८/- प्रति किलो लिटर वरुन रुपये ११/- प्रति किलो लिटर या प्रमाणे वाढीस मंजुरी देण्यात येते.

५. मीटरसह असलेल्या व्यावसायीक नळ जोडण्यांकरीता रुपये ३९/- प्रति किलो लिटर वरुन रुपये ५५/- प्रति किलो लिटर या प्रमाणे दर वाढीस मंजुरी देण्यात येते.

उपरोक्त वाढीव पाणीपट्टी दराने चालु आर्थिक वर्षापासून म्हणजे दिनांक ०१ एप्रिल २०१२ पासून पाणीपट्टी वसुल करण्याचा तसेच शहरातील शाळा, महाविद्यालये, शासकीय/ निमशासकीय कार्यालये, दवाखाने, चॅरीटेबल ट्रस्ट आणि इतर सेवाभावी संस्था इ. यांना व्यावसायीक दराने पाणीपट्टी आकारण्याचा आणि सर्व मार्गस्थ ग्राहकांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे वेळोवेळी निघणाऱ्या परिपत्रकानुसार ठरविण्यात आलेले दर आणि महानगरपालिकेने वरीलप्रमाणे ठरविलेले दर यापैकी जे दर जास्त असतील त्या दराने मार्गस्थ ग्राहकांकडुन पाणीपट्टी आकारणेच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. तसेच उपरोक्त क्र. १ ते ५ मध्ये नमुद केलेल्या पाणीपट्टीच्या सर्व प्रकारच्या दरांमध्ये दरवर्षी सरसकट १०% (दहा टक्के) वाढ करण्यासही मान्यता देण्यात येते. औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेचा पीपीपी तत्वावरील Concession Period हा वीस (२०) वर्षांचा असल्याने या वीस (२०) वर्षांच्या प्रकल्प कालावधीत सदर १०% दरवाढ दरवर्षी आपोआप होत राहील. त्यानुसार १०% वाढीव दराने सर्व प्रकारच्या (उदा. घरगुती / व्यावसायीक इ.) पाणीपट्टीची वसुली

करण्यात यावी. या दरवर्षी होणाऱ्या १०% (दहा टक्के) नैसर्गिक दरवाढीस आजच्या सभेत सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे. वाढीव पाणीपट्टीदरामुळे मिळणारा अतिरिक्त महसुल हा महानगरपालिकेच्या खात्यात जमा करावा. जेणेकरुन औरंगाबाद वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या Concession period मध्ये संबंधीत विकासकास जी A.O.S.G. ची रक्कम महानगरपालिकेतर्फे द्यावी लागणार आहे, ती रक्कम देणे महानगरपालिकेस सुकर होईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :१० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते (वेळ दु. २.५४ वा. पुन्हा ४.०० वा. सभेला सुरूवात)

विषय क्र.४२२:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, तत्कालीन नगर परिषद औरंगाबाद व तद्नंतर औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रत्यक्ष ताब्यामध्ये व जागेवर पूर्वीपासुन काही प्रमाणावर विकसीत केलेल्या जुन्या मिळकती ज्यांचे इमारतीचे वयोमान पूर्णपणे संपले आहे तसेच इमारतीचा व परिसराचा वापर त्या अनुषंगाने होत नसल्याचे आढळून येत असल्याने अशा इमारती / खुल्या जागा आता विकसीत करणे बाबत नव्याने विचार होणे आवश्यक आहे. या इमारतीचे / खुल्या जागेचे आता व्यावसायीक महत्व मोठया प्रमाणावर वाढले असून त्यांची नव्याने उभारणी करणे महानगरपालिकेच्या हिताचे दृष्टीने आवश्यक आहे. प्रत्यक्ष जागेवर उपलब्ध असलेले क्षेत्र पाहता त्या ठिकाणी बांधण्यात आलेले इमारतीचे क्षेत्र हे अत्यंत कमी असून बहुतांश ठिकाणी फक्त तळ मजला एवढेच बांधलेले आहे. जागेवरील जागेचे आलेले विद्यमान कालावधी मधील व्यावसायीक महत्व पाहता आता शहरासाठीच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावली मध्ये देय पूर्ण चटईक्षेत्र मर्यादेत त्याचा विकास होणे आवश्यक आहे. बहुतांश ठिकाणी बहुमजली इमारती बांधणे शक्य आहे. जेणेकरुन त्या भाडे तत्वावर देऊन महानगरपालिकेच्या आर्थिक उत्त्पन्नास त्याचा फायदा होऊ शकतो. विकास नियंत्रण नियमावली मधील आवश्यक तरतुदी पूर्णपणे नगर रचना विभागामधुन तपासल्या गेल्यानंतर तसेच मंजुर शहर विकास आराखडा मधील जागेचे नियोजीत आरक्षण विचारात घेऊन प्रस्ताव त्यानुसार तयार करण्यात येईल.

विद्यमान स्थिती मध्ये पाहणी केली असता शहरातील अशा एकुण सहा जागा प्राथमिक स्वरुपात समोर आल्या असुन त्या खालील प्रमाणे

१. औरंगपुरा भाजी मंडई
२. शहागंज व्यापारी संकुल
३. जाफरगेट व्यापारी संकुल
४. निजामोद्दीन दर्गा व्यापारी
५. पिरबाजार व्यापारी संकुल
६. सब्जीमंडी व्यापारी संकुल रॉक्सी सिनेमा जवळ

वरील जागांचे मंजुर विकास योजने नुसार वापर अनुक्रमे भाजी मार्केट, आठवडी बाजार व दुकान केंद्रे आणि वाहनतळ इत्यादी करीता असल्याचे दिसून येते. त्यानुषंगाने संपूर्ण क्षेत्र विकास आधुनिक पध्दतीने करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय स्तरावर वास्तुविशारदांचे पॅनल तयार करण्यात आले असून त्यांचे मार्फत वरील सहा ठिकाणी नियोजनाचे प्राथमिक आराखडे तयार करण्यात आलेले आहेत. या आराखडयांना अंतिम रुप देणे बाकी आहे.

महानगरपालिकेच्या मालकीच्या उक्त जागांचे व इमारतीची विद्यमानस्थिती पाहता तसेच जागेच्या / इमारतीच्या पासून महानगरपालिकेस होणारे आर्थिक उत्पन्न पाहता या सर्व मिळकती आता आलेले जागेचे व्यावसायीक महत्व विचारता घेता जुन्या इमारती पाडुन त्या ठिकाणी नविन बांधकाम प्रस्तावित करण्यात येत आहे. ज्यामुळे त्या जागेचा संपुर्ण देय चटई निर्देशांक वापरात येऊ शकतो. महानगरपालिकेस त्यापासुन अधिक आर्थिक उत्पन्न प्राप्त होऊ शकते. तसेच शहराचा विकास होऊ शकतो.

तरी वरील प्रमाणे सहा जागेचे जुन्या इमारती पुर्णपणे पाडुन विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदी नुसार पुर्ण क्षमतेचा विकास करणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तसेच विचारार्थ सादर

संवाद :

श्री.त्रिंबक तुपे :प्रशासनाचा खुलासा घ्यावा.

शहर अभियंता :सहा ठिकाणी शॉपीग सेंटर आहे जागेच्या प्रमाणात कमी बांधकाम झ ाले पुर्णपणे एफएसआय वापरलेला नाही त्यामूळे उत्पन्न कमी येते हें पाडून नवीन संकुल बांधले तर उत्पन्न वाढेल त्यासाठी प्रस्ताव दिला.

श्री.मुजीब खान :याचे प्लॅनींग तयार केले का?

शहर अभियंता :प्लॅनींग तयार आहे आर्कीटेक नेमले_

श्री.मुजीब खान :अनेकदा ठराव अर्धवट येतात अगोदर मंजूरीला येतात काही शिल्लक राहतात हे शॉपींग जुने आहे अनेक वर्षापासून तेथे लोक व्यवसाय करतात त्यांचा काय विचार केला प्लॅनींग केले असेल तर सादर का केले नाही मंजूरी देणार लोक कोर्टात जातील स्थगिती आणतील असे होण्या अगोदर सर्व प्लनींग सहीत यावे बांधकाम कसे करणार आहोत,४० वर्षापासून तेथे लोक आहे त्यांना काढणार काय?

शहर अभियंता :या विषयावर चर्चा झाली ते लोक जर तेथे आहे त्यांचेसाठी अकोमेंडेट करणार आहोत.

श्री.त्रिंबक तुपे : स.श्री.मुजीब खान जे बोलतात तो ४२३ विषय असावा.४२२ विषय चालू आहे.

सहा.संचालक (न.र) ज्याचेकडे महापालिकेच्या करारनाम्याचे कागदपत्र नव्हते, भाडे देत नव्हते,ताबा दुस-याचा होता अशांना दि.१७-६-११ व १८-६-२०११ रोजी नोटीस दिली असे एकदंर ६७५ दुकाने होती या दुकानाची ६ पथकांच्या मार्फत तपासणी करून ४१९ दुकाने सील केली एकूण दुकान केंद्रे २२ आहे गाळयांना सील केल्यानंतर विविध स्तरावरून मागणी व स पदाधिकारी मा.आमदार यांचे बरोबर झालेल्या बैठका याचा विचार करून ॲफिडेव्हीट घेवून २२१ दुकाने उघडली त्यापैकी ११३ लोक मा.उच्च न्यायालयात गेलेले होते मा.न्यायालयाच्या आदेशानुसार ११३ दुकाने उघडली १४५ दुकाने अजुनही सील आहे.२२ दुकान केंद्रापैकी ६ ठिकाणी दुकाने ४० वर्षापुर्वीची जुनी त्यात औरंगपूरा व्यापारी संकुल, शहागंज,जाफरगेट, निजामउद्दीन दर्गा व्यापारी संकूल ,पीरबाजार, व सब्जीमंडी व्यापारी संकुल आहे तसेच एकनाथनगर येथील व्यापारी संकूल रस्त्यात आल्यामूळे व मा. न्यायालयाचे आदेश असल्यामूळे ते

पाडण्यासाठी प्रस्तावित केले परंतु तेथे नवीन प्रस्तावति नाही.२२ पैकी ६ ठिकाणचे पाडून बांधण्या बाबत ४२२ विषयात शहर अभियंता यांनी प्रस्तावति केले त्या दुकानाची पाहणी करून तसा अभिप्राय सादर केला दुकानदारांना तसे पत्र ही दिले की जेंव्हा दुकाने बांधली जातील त्यांना प्राधान्य दिले जाईल.या बाबत शहर अभियंता आर्कीटेक्ट मार्फत नकाशे मागविण्यात आले त्याचे मालकी हक्काबाबत व इतर छाननी चालू आहे पुर्ण प्रस्ताव होईल त्यानंतर ते ही कार्यवाही होईल.

श्री.मीर हिदायत अली : ६ मार्केटपैकी २ मार्केटची जागा वक्फ बोर्डची असल्याचे त्यांनी चॅलेंज केले आहे कागदपत्र दाखल केले तर ती मालकी कुणाची ते स्पष्ट करावे.

सहा.संचालक(न.र) :एकूण ६ ठिकाण पैकी औरंगपूरा व्यापारी संकुलाचे मालकी हक्काचे कागदपत्र नाही,शहांगज संकुलणाचे पीआर कार्ड आहे, जाफरगेटचे पार्ट आहे आणि भुसंपादन आपण केले येथील मार्केटची कागदपत्र आपल्याकडे नाही. निजामउद्दीन दर्गा व्यापारी संकूलाची कागदपत्रे नाहीत,पीर बाजारची जागा सरकारी आहे, सब्जीमंडीचे भुसंपादन केले आहे.या ६ ठिकाणी मालकी हक्क , पीआर कार्ड ,सातबाराचे कागदपत्र करण्यासाठी वकीलाची नियुक्ती केली कार्यवाही चालू आहे मालकी हक्काची कार्यवाही व नकाशाची छाननी झाल्यानंतरच इम्प्लीमेंन्ट होईल दरम्यानच्या काळामध्ये ती दुकाने पाडणे आवश्यक असल्याने प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवला .

श्री.प्रमोद राठोड :शॉपींग पाडणे व बांधण्याच्या उद्देशाने प्रस्ताव आलेला आहे. एफएसआय कन्झ्युम करणार म्हटले ही इमारत पाडण्या अगोदर उदा.औरंगपूरा भाजीमंडई तेथे नेमके काय करणार प्रथम आराखडा बनवावा तेथे किती दुकाने आहे किती दुकान होणार १०० दुकाने होणार असेल तर २० गाळेधारक पुर्वीचे असेल त्यांना कोणत्या मजल्यावरीत कोणती दुकाने देणार महापालिकेकडे कोणती दुकाने राहतील दुस-याकडून विकसीत करून घेणार असेल तर त्यांचा वाटा काय असणार हे सर्व पाडण्या अगोदर सुधारीत प्रस्ताव दयावा जर विकासकाने शॉपीग केले समोरची दुकाने ठेवली व जुने गाळेधारक यांनी देखिल समोरची दुकानाची मागणी केली दिले नाही तर मा.न्यायालयात धाव घेतील अशा वेळी काय भुमिका प्रशासन घेणार आहे सर्व माहिती समोर यावी त्यानंतर या प्रस्तावास मंजूरी दयावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :४२२ व ४२३ हे विषय सारखेच आहे वेगवेगळे ठेवण्याची गरज नव्हती.४२२ मध्ये म्हटले २२ मार्केट आहे, ६ मार्केट ४० वर्षापुर्वीची जुनी असल्याने पाडणे आवश्यक आहे एकूण दुकाने ६७५ आहे ६ मार्केट जे पाडणार तेथे किती दुकाने आहे किती लोकांनी सध्या दुकाने घेतली आहेत ६ पैकी किती जागेवरील पीआर कार्ड महापालिकेच्या मालकीचे आहे १०० टक्के एफएसआय वापरल्यानंतर किती दुकाने होणार किती उत्पन्न मिळणार वास्तुविशारद यांना दिले असे म्हटले यासह सविस्तर

यावे .प्लॅनींग नंतर एका ठिकाणी किती क्षेत्रफळ बांधकाम करणार,जाफरगेट येथिल ५० टक्के ही रोडवाईडींग मध्ये जागा जाते तेथे मार्केटच नाही तेथील लोकांना काढणार त्यांचेसाठी काय विचार केला शहागंज मध्ये १७४-१७५ दुकाने आहे त्याचेसाठी काय करणार परीपुर्ण दोन्ही ठराव ठेवावे काम करतांना मा.न्यायालयाचे स्थगिती व इतर आदेश व कामात व्यत्यय येणार नाही असे सविस्तर यावे त्यानंतर किती निधी लागतो धोरण ठरविता येईल त्या लोकांची सहमती असेल तरी त्यांना दुकाने कुठे देणार आहोत.रॉक्सी च्या ठिकाणी १४ दुकाने आहे त्यांची समोर दुकाने आहे त्यांना कुठे दुकाने देणार हे सर्व अगोदर ठरवून व महापालिकेच्या नियमात बसवून संपुर्ण माहितीसह प्रस्ताव ठेवावा.दोन्ही प्रस्ताव एकत्र करून तेथे गाळेधारका किती मालकीसह यावे दुकाने सील केली त्यावेळी गाळेधारकांनी स्वत:हून म्हटले होते की पर्यायी जागा दिली तर आम्ही मदत करतो.लेखी आश्वासन देवू शकतो पुढे कार्यवाही थांबण्या ऐवजी प्रस्ताव परीपुर्ण आल्यास योग्य तो निर्णय घेता येईल.

शहर अभियंता :४२२ प्रस्तावा मध्ये ही जुन्या ६ इमारत पाडणे व विकास नियंत्रण मध्ये ज्या तरतुदी आहे त्याप्रमाणे डेव्हलमेंन्ट करणे यास मंजूरी मिळाल्यानंतर पुढील जे डेंव्हलमेंन्टचे काम आहे ते पुन्हा सभागृहासमोर आणले जाईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :दुकाने पाडणार त्या लोकांनी कुठे उदरनिर्वाह करायचा ते सांगावे

शहर अभियंता :त्याचे अकोमोडेशन होणार आहे.

मा.उपमहापौर :४२२ विषयात डेंव्हलपमेंन्ट प्लॅन नुसार नकाशे तयार करण्यासाठी आहे ४२३ मध्ये ते काय प्लॅनींग करणार आहे डिटेल दिले आहे या प्रस्तावास ऑलरेडी उशीर झालेला आहे ४२२ मंजूर करावा प्रशासनाला सर्व मॅप तयार करण्याचे सांगावे ते मॅप आपण बघावे नंतर ४२३ मंजूरी दयावी

श्री.मीर हिदायत अली :२ मार्केटचे कागदपत्र नाही तर कसे पाडणार आहे.

मा. उपमहापौर :३० वर्षापासून मालकी आहे महापालिकेचा कब्जा आहे

श्री.त्रिंबक तुपे :दोन जागेचे कागदपत्र नाही ते प्रशासन मिळवतील परंतु ४ जागेचे सर्व कागदपत्र आहे तर ते काम सुरू करता येईल.

श्री.राजू शिंदे :दुरूस्तीसह मंजूर करावे ज्या अडचणी येत असतील त्यावर आपण एकत्रित बसून उपाय काय करायचे ते करू ४२२ व ४२३ दुरूस्तीसह मंजूर करावे.

श्री.त्रिंबक तुपे :दोन्ही विषय दुरूस्तीसह मंजूर करावे.पुढील काम सुरू होईल.

सौ.किर्ती शिंदे :आर्किटेक व नगररचना विभागाने तयार केलेले प्लॅन स.सदस्यांना दाखवून त्यानंतर त्यास अंतिम मंजूरी देण्यात यावी.व्यापारी संकुल, भाजी मार्केट,वाहनतळ हे महापालिका विकसीत करणार की बीओटीवर देणार हे स्पष्ट करावे.बीओटीवर काम देवून ठेकेदार प्लॅन तयार करणार असेल तर महापालिकेला काय फायदा होणार आहे माहिती दयावी.

श्री.मुजीब खान :४२२,४२३ विषय संदर्भात मा.आयुक्त यांनी काही दुकांना सील केले होते त्यावर काही लोक न्यायालयात दाद मागण्यासाठी गेले. मा. न्यायालयाचे काय निर्णय आलेला आहे वाचून दाखवावे. मा.न्यायालयात वाद चालू असतांना त्या इमारतीतील शॉपीग पाडता येते का खुलासा करावा.

श्री.राजू शिंदे :ऑलरेडी या प्रस्तावाला उशीर झालेला आहे.महापालिकेच्या शॉपींग, तसेच ज्या मालमत्ता होत्या त्या मा.आयुक्तांनी शोधल्या त्याबंध्दल त्याचे अभिनंदन करावेसे वाटते.काही प्रमाणात वाद निर्माण झाला परंतु त्या मागचा हेतू असा होता की,महापालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे उत्पन्नात भर पडली पाहिजे यामागचा हेतू हा चांगला होता अनेक दिवसापासूनचे गाळेधारक होते त्यांना थोडासा रिलीफ मिळाला म्हणून काही प्रमाणात विचार केलेला आहे ज्या मालमत्ता महापालिकेच्या ताब्यात आहे नावावर आहे तेथे काम चालू करण्यास हरकत नाही.लहान मोठया ज्या दुरूस्त्या असतील त्या करून हा विषय मंजूर करावा.

मा.महापौर :दुरूस्तीसह मंजूर

ठराव:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १.औरंगपुरा भाजी मंडई २.शहागंज व्यापारी संकुल ३.जाफरगेट व्यापारी संकुल ४.निजामोद्दीन दर्गा व्यापारी ५.पिरबाजार व्यापारी संकुल ६.सब्जीमंडी व्यापारी संकुल रॉक्सी सिनेमा जवळ, या सहा जागेचे जुन्या इमारती पुर्णपणे पाडुन विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदी नुसार ज्या मालमत्ता महानगरपालिकेच्या ताब्यात व नांवावर आहेत तेथे पुर्ण क्षमतेचा विकास करण्यास मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.४२३:

आयुक्त यांचेकडुन प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील विविध व्यापारी संकुलातील दुकाने मागील ३०-३५ वर्षापासुन भाडेपट्टयावर देण्यात आलेली असुन त्यांचेकडुन आजही जुन्यादराने भाडे आकारण्यात येते, संबंधित गाळाधारकांकडून नियमीत भाडे भरणा करण्यात येत नाही, तसेच गाळाधारकांकडे त्यांच्या गाळयाबाबत कोणतेही करारनामा/अधिकृत वापर, ताबा, स्थापित करणारी कागदपत्रे नसल्याची माहिती आढळुन आल्याने मनपा उत्पन्नवाढीच्या दृष्टीने अशा सर्व प्रकरणात अद्ययावत व विहित कागदपत्राची तपासणी, खात्री करुन करारनामा, अटीशर्ती संबंधाने भाडेवाढ, भाडे वसुली करणे, पोटभाडेकरु, अनधिकृत वापर इत्यादी संबंधाने कार्यवाही करण्याकरीता सहा पथकाव्दारे जानेवारी २०११ मध्ये प्रथम व्यापारी संकुल निहाय/दुकान निहाय सर्वेक्षण करुन प्रत्यक्ष माहिती घेण्यात आली व आढळुन आलेल्या अनियमीतता बाबत तद्नंतर त्या सर्वेक्षणातील माहिती आधारे दि. १७/०६/२०११ व १८/०६/२०११ रोजी नोटीस/जाहिर प्रगटन माध्यमातुन सर्व संबंधितास अवगत करुन त्यांचे अधिकृत वापर स्थापित करणारे कागदपत्रे, करारनामा इत्यादीच्या प्रती सादर करण्याचे सुचीत केले व दि. १७/०६/२०११ चे आदेशाने गठीत सहा पथकाकडुन त्यानंतर दि. २०/०६/२०११ पासुन प्रत्यक्ष कार्यवाही सुरु केली. त्यामध्ये एकुण ४५८ दुकाने, त्याचा वापर, कागदपत्राची अनियमितता यामुळे सील करण्यात आली. त्यापैकी २६ दुकाने दि. २५/०६/२०११ चे सुनावणी अंती सिल

उघडुन देण्यास पात्र होत असल्याने उघडण्यात आली. उर्वरीत ४३२ दुकाने मनपाच्या ताब्यात घेण्यात आली आहेत.

सिल केलेल्या दुकाना संबंधाने संबंधित गाळेधारक यांनी विविध स्तरावर भेटुन त्यांच्या अनियमिततांचा जसे की, करारनामा न करणे, करारनामाचे नुतनीकरण न करणे, करारनाम्यातील अटी शर्तीचा भंग करणे, भाडेवाढ न करणे, नियमित भाडे न भरणे, अंतर्गत फेरबदल करणे या व अशा विविध कारणांचा विचार होऊन या अनियमता नियमीत करुन त्यांना पुन्हा पुढील काळासाठी सिल उघडुन गाळे ताब्यात देण्याची मागणी केली होती. त्याबाबत धरणे, निर्देशने या माध्यमातुन व स्थानिक मा. आमदार, खासदार, पदाधिकारी इत्यादीच्या मार्फत पाठपुरावा करण्यात आला आहे.

या कार्यवाही दरम्यान दि.२२/०६/२०११ रोजी मा. महापौर/स. पदाधिकारी, स. सदस्य यांची उपस्थितीत मा. स्थायी समिती दालनात बैठक संपन्न होऊन त्यामध्ये उपस्थित सर्व मान्यवरांना कार्यवाही बाबत अवगत केले असता त्यावेळी सदर दुकानासंबंधी पुढील कार्यवाही बाबतचे सर्व अधिकार सर्वानुमते मा. आयुक्त यांना दिल्याचे मान्य करुन प्रशासनाकडुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने व उत्पन्नाचा कायम स्वरुपी स्त्रोत कायम करण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी त्याचे पुर्ण समर्थन करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले.

उक्त कार्यवाही पुर्ण झालेनंतर दि. २७/०६/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व पथक प्रमुख/वरिष्ठ अधिकारी, सहाय्यक इत्यादीचे बैठकीत कार्यवाहीचा तपशिल आढावा घेऊन प्राप्त सुचना व नमुद वस्तुस्थिती आधारे/त्या अनुषंगाने प्रशासनाने निश्चित केलेल्या कार्यवाही संबंधाने दुपारी ०२.०० वाजता मा. महापौर यांचे दालनात झालेल्या स. पदाधिकारी यांचे बैठकीत सविस्तर चर्चा झाली. त्यावेळी सकाळी ११:०० वाजता मनपा अधिकारी यांचे बैठकीतील मुद्दे/वस्तुस्थिती/सुचना इत्यादीची माहिती देऊन प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या कार्यवाहीबाबत/प्रस्तावाबाबत स.पदाधिकारी यांना अवगत करण्यात आले. प्रशासनाकडून या कार्यवाही अंतर्गत सादर केलेले प्रस्ताव, प्रस्तावित कार्यवाही खालील प्रमाणे आहे.

०१. औरंगाबाद शहरात महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील विविध व्यापारी संकुलापैकी काही व्यापारी संकुलांचे बांधकाम तत्कालीन नगर पालिकेच्या काळात झालेले असुन आज स्थितीत ते बांधकाम जवळपास सुमारे ४० वर्षापुर्वीचे असुन त्यावेळीचे नियोजन व गरज यानुसार त्यावेळी बांधकाम केलेले असुन आजच्या स्थितीत त्या बांधकामाचे नियोजन कालबाह्य (Out dated) झालेले असून आज स्थितीत त्या ठिकाणी देय असलेल्या एफएसआयचा २५-३० टक्के वापर झालेला असुन उर्वरीत देय एफएसआयचा वापर झालेला नाही. वाढीव बांधकामची शक्यता व त्यामुळे महानगरपालिकेस कायमस्वरुपी मिळणारे उत्पन्नवाढीचे स्त्रोत स्थापित करण्याचे विचारात घेऊन सद्याच्या व्यापारी संकुलातील मुलभुत सेवासुविधांच्या अभावामुळे निर्माण झालेल्या समस्या तसेच पार्किंग सुविधा नसल्याने निर्माण होणाऱ्या अडचणी इत्यादी विचारात घेऊन अशा ठिकाणी जुने पडावयास आलेले बांधकाम, व्यापारी संकुल तोडुन नव्याने सर्व सेवासुविधा युक्त, आधुनिक स्वरुपाचे नियोजनाआधारे केलेल्या बांधकामामुळे अधिकचा रोजगार व जागा उपलब्ध होऊन मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ करणारे प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. हे स्पष्ट करून प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने खालील ठिकाणचे व्यापारी संकुल पाडून नविन व्यापारी संकुल बांधण्याचे प्रस्तावित केले आहे.

१) औरंगपुरा व्यापारी संकुल
२) शहागंज व्यापारी संकुल
३) जाफरगेट व्यापारी संकुल
४) निजामोद्दीन दर्गा व्यापारी संकुल
५) पीर बाजार व्यापारी संकुल
६) सब्जीमंडी व्यापारी संकुल (रॉक्सी सिनेमा जवळ)

तसेच या व्यापारी संकुलापैकी एकनाथ नगर येथील व्यापारी संकुल मंजुर विकास योजना २४ मीटर रस्त्याच्या जागेत असल्याने व मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार ९ मी ते ४५ मी रुंदीच्या रस्त्याच्या जागेत कोणतेही बांधकाम देय नसल्याने सदर व्यापारी संकुल तोडण्याचे प्रस्तावित केले आहे.

०२. वर नमूद केल्याप्रमाणे सिल केलेल्या एकुण ४३२ गाळयापैकी उपरोक्त प्रस्तावानुसार ज्या व्यापारी संकुलाचे जुने बांधकाम तोडून नव्याने प्रकल्प प्रस्तावित आहे, अशा व्यापारी संकुलातील खालील प्रमाणे

१. औरंगपुरा व्यापारी संकुल	-	३४
२. शहागंज व्यापारी संकुल	-	१७४
३. जाफरगेट	-	२३
४. निजामोद्दीन दर्गा	-	१७
५. पिरबाजार	-	११
६. सब्जीमंडी	-	३७

गाळे वगळता उर्वरीत व्यापारी संकुलातील जे गाळे उघडुन पुढील कालावधी करीता भाडेपट्टयाने द्यावयाचे आहेत, त्या गाळयाकरीता अशा गाळेधारकांकडुन बाजार भावानुसारचे भाडे व रेडी रेकनरने निश्चित होणाऱ्या भाडे दराचे दिडपट भाडे रक्कम यापैकी जास्तीत जास्त रक्कम आधारभुत भाडे रक्कम म्हणुन घेऊन त्याआधारे खुल्या बोलीने जाहीर लिलाव करून उच्च बोलीकरीता एक वर्षाचे आगाऊ भाडे व दोन वर्षाच्या भाडे रक्कमेइतकी बँक गॅरंटी घेऊन गाळे पुढील कालावधीसाठी देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. या बाबत स्थानिक वर्तमान पत्रात जाहिर लिलाव (खुल्या बोलीने) बाबतची सूचना देऊन तीन वर्षाच्या कालावधीकरीता गाळे भाड्याने देण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

प्रस्तावित ६ ठिकाणी नव्याने बांधकाम करावयाचे प्रस्तावित आहे ते शहर अभियंता यांचे अध्यक्षतेखालील समितीने दिलेल्या अहवालानुसार समर्थनिय आहे. सदरील ठिकाणचे बांधकाम सुमारे ४० वर्षापुर्वीचे असुन सद्याची बांधकाम स्थिती व पुढील कालावधीसाठी दुकाने भाडयाने देण्याची कायदेशिर करारनामा करण्याची कार्यवाही करता किमान १० वर्षा करीता महानगरपालिकेची निर्माण होणारी कायदेशिर जबाबदारी याचा एकत्रित विचार करुन अशा व्यापारी संकुलाचे बांधकाम पाडुन तेथे नव्याने बांधकाम करतांना महानगरपालिकेस देय पुर्ण एफएसआय ऐवढे क्षेत्र विकसित करता येईल सोबतचे आधुनिक सेवासुविधा, पार्किंग इत्यादीची तरतुद करुन वाढीव क्षेत्रा करीता व्यापारी संकुल बांधणे शक्य होईल व त्यामुळे मनपाच्या आर्थिक उत्पन्नाचा कायमस्वरुपी स्त्रोत स्थापन होऊन मनपा उत्पन्नात मोठया प्रमाणात भर पडु शकेल सद्याची आर्थिक स्थिती पाहता असे प्रकल्प राबविणे, त्या अनुषंगाने नियोजन करणे गरजेचे झाले आहे. निधी उपलब्धतेचे पर्याय पडताळुन जसे की, अनामत रक्कम घेऊन, पीपी प्रोजेक्ट या माध्यमातुन प्रकल्प कार्यवाही करणे शक्य आहे. त्यामुळे प्रकल्प राबविण्यात अडचण

नाही, नव्या होणाऱ्या बांधकामामध्ये सोईसुविधांची पुर्ततासह आधुनिक नियोजन करण्यात येईल. ज्यामुळे व्यापारी संकुलातील गाळेधारकांना व शहरातील नागरिकांना आधुनिक सोईसुविधांचा पुरेपुर आनंद व फायदा घेता येईल. तसेच रोजगार निर्मितीच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध होतील.

दि.२७-६-२०११ रोजीच्या स.पदाधिकारी व स.सदस्य यांच्या सोबत झालेल्या बैठकीत वरील प्रमाणे प्रशासनामार्फत प्रस्तावित केलेल्या कार्यवाही, प्रस्तावाची माहिती दिल्यानंतर स. पदाधिकारी यांनी त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही बाबत चर्चा करून वरील प्रस्तावा प्रमाणे जुने व्यापारी संकुल तोडून तेथे नव्याने बांधकाम करणेस सहमती दर्शवुन सदरच्या व्यापारी संकुलातील दुकाने वगळता उर्वरीत व्यापारी संकुलातील दुकाने पुढील कालावधीकरीता भाडेपट्टयावर देण्याबाबत जसे की, खुल्या बोलीने जाहीर लिलाव करून दुकाने भाडेतत्वावर देण्याच्या कार्यवाहीऐवजी बाजारभावाने होणारे भाडे व रेडी रेकनर प्रमाणे होणाऱ्या भाडे रक्कमेच्या दिडपट भाडे यापैकी जास्तीत जास्त रक्कम असलेले भाडे निश्चित करून त्याआधारे आता ज्यांच्या ताब्यात आहेत त्यांना पून्हा पुढील कालावधीकरीता प्रशासनाने प्रस्तावित केल्याप्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे व दोन वर्षाच्या भाडे रक्कमेऐवढी बँक गॅरंटी घेऊन नव्याने करारनामा करून तीन वर्षाच्या कालावधीकरीता दुकाने भाड्याने देण्यात यावी, असा धोरणात्मक निर्णय घेऊन त्यास मान्यता देण्यात आली.

दि. २७/०६/२०११ चे धोरणात्मक निर्णयाच्या दिशेने निर्णय प्रक्रियेतील अंतिम टप्प्याचे दरम्यान मा. खासदार यांचेशी झालेली चर्चा करुन त्यांनाही मनपाकडुन करण्यात येणारी कार्यवाही, उत्पन्न वाढीचे दृष्टीने आवश्यक असलेल्या प्रस्तावित प्रकल्प इत्यादी बाबत माहिती दिली. त्यावेळीच्या मागणी संबंधाने संबंधित गाळेधारकांना साहित्य परत देण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले.

या संबंधाने दि. २८/०६/२०११ रोजी सिल केलेल्या दुकाना बाबत निर्णय घेऊन स्थानिक वर्तमानपत्राव्दारे जाहिर सुचनेच्या माध्यमातुन सर्व संबंधिताना अवगत केले.

या जाहिर सुचना व त्या अनुषंगानेच्या कार्यवाही संबंधाने दि. २९/०६/२०११ रोजी सकाळी ११.०० सर्व स. पदाधिकारी/स. सदस्य यांनी मा. आयुक्त यांची त्यांचे दालनात भेट घेऊन चर्चा करतांना आग्रही मागणी करता त्यांना जाहिर सुचना, दुकानदाराकडुन स.पदाधिकारी यांचेकडे होणारी मागणी संबंधाने सकारात्मक कार्यवाहीच्या दृष्टीने जुने बांधकाम पाडून नव्याने बांधण्यात येणाऱ्या वर नमूद सहा व्यापारी संकुलातील गाळेधारकांना जुन्या व्यापारी संकुलातील गाळेधारका/भोगवटाधारक यांचा नविन प्रकल्पामध्ये सहानुभूतीने विचार करण्यात येईल, असे पत्र देण्यात आले.

वर नमुद केलेल्या प्रत्येक टप्प्यावरील कार्यवाही व त्या त्या संबंधाने झालेली सविस्तर चर्चा प्राप्त निवेदन, मागणी इत्यादीसह मनपा आर्थिक स्थिती व उत्पन्नवाढीचे स्त्रोत यांचा विचार करता खुलासा करण्यात येतो की,

हया दुकाने सिल करण्याच्या कार्यवाही मध्ये प्रत्येक टप्प्यावर संबंधित दुकान गाळेधारक, स. सदस्य, स. पदाधिकारी, मा. महापौर व मा. खासदार, मा. आमदार यांचेशी वेळोवेळी बैठका होऊन त्यात झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही केलेली आहे. प्रथम बैठक २२/०६/२०११ रोजी स. पदाधिकारी व स. सदस्य यांच्या उपस्थितीत मा. स्थायी समिती दालनात संपन्न झाली. तद्नंतर दि. २७/०६/२०११ रोजीच्या बैठकीतील धोरनात्मक निर्णय आधारे संबंधितांना त्यांच्या सिल केलेल्या दुकानातील साहित्य काढुन घेण्याकरीता दि.

२९/०६/२०११ रोजी व्यवस्था उपलब्ध करुन दिली. तसेच जी पुढील तीन वर्षाच्या कालावधी करीता भाडेपट्टयावर द्यावयाची त्याकरीता एक वर्षाचे अगाऊ भाडे व दोन वर्षाच्या भाडे रक्कमेची बँक गॅरंटी देण्याची पुर्तता करण्याची पुर्तता करणाऱ्या गाळेधारकांची गाळे उघडुन देण्या बाबत स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर सूचना देऊन गाळेधारकांना अवगत करण्यात आले. या संबंधाने नंतर दि. २९/०६/२०११ रोजी सकाळी स. पदाधिकारी, स. सदस्य यांचेशी झालेल्या बैठकीतील चर्चेत स. पदाधिकारी व स. सदस्य यांनी सूचविल्यानुसार दोन वर्षाच्या भाडेरक्कमे इतकी बँक गॅरंटी घेणे ऐवजी एक वर्षाचे अगाऊ भाडे व एक वर्षाचे भाडे रक्कमेचे डिपॉझिट घेऊन सिल उघडण्याची कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच संबंधित दुकानदारांना विश्वास देण्यासाठी अश्वासित करण्याचे पत्र देण्याबाबत स. पदाधिकारी यांचे निर्देशानुसार जे व्यापारी संकुल पाडुन नव्याने व्यापारी संकुल बांधण्याचे प्रस्तावित आहे अशा व्यापारी संकुलातील गाळे धारकांना नव्याने बांधकाम करतांना गाळेधारंकांचा सहानुभूतीपुर्वक विचार करता येईल असे पत्र दि. २९/०६/२०११ रोजी पथक प्रमुखा मार्फत देण्यात आले.

हया दरम्यान दि. ०५/०७/२०११ रोजी मा. महापौर यांचे दालनात मा. आमदार किशनचंद तनवाणी व स. पदाधिकारी, स. सदस्य, आयुक्त, शहर अभियंता, सहाय्यक संचालक नगर रचना, विधी सल्लागार यांचे उपस्थितीत झालेल्या बैठकीत गाळेधारकांच्या मागणी संबंधाने त्यांचे आंदोलन, विविध स्तरावरुन होणारा पाठपुरावा, दुकाने सिल असल्याने मागील १५ दिवसात बुडालेला रोजगार, दुकाने सिल केल्याने दुकानात अडकलेले साहित्य, नाशवंत साहित्यामुळे निर्माण होणारा आरोग्याचा प्रश्न, काही दुकानात ग्राहंकाचे सामान अडकल्याने होणारी अडचण/मागणी इत्यादीमुळे सिल केलेल्या दुकानांचे सिल उघडण्याबाबतची आग्रही मागणी व चर्चेत आलेले प्रस्ताव, पर्याय, कायदेशिरबाबी इत्यादी विचारात घेऊन संबंधित गाळाधारकांकडुन तसे रक्कम रु. १००/- च्या मुद्रांकावर शपथपत्र घेऊन दुकानांचे सिल उघडण्याबाबत धोरणात्मक निर्णय होऊन तशा कार्यवाही बाबत स्थानिक वर्तमान पत्रातुन सर्व संबंधितांना/गाळेधारकांना अवगत करुन शपथपत्राचा नमुना देऊन पथकप्रमुखांना पुर्तता करण्याऱ्या पात्र दुकानांचे सिल उघडयाचे आदेश देण्यात आले.

दि.०६/०७/२०११ रोजी उक्त कार्यवाहीमध्ये द्यावयाचे शपथपत्र नमुना संबंधाने मुद्दा उपस्थित होऊन संबंधित गाळाधारकास जेथे व्यापारी संकुल पाडुन नव्याने व्यापारी संकुल बांधणे प्रस्तावित आहे तेथे आता त्यांचे दुकान क्षेत्रफळा एवढे क्षेत्र प्राधान्याने देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. या संबंधाने दि. ०६/०७/२०११ रोजी दुपारी ०२.०० वाजता आयुक्त यांचे दालनात मा. आमदार किशनचंद तनवाणी, स. पदाधिकारी, स. सदस्य यांचे उपस्थितीत सांगोपांग चर्चा होऊन वरील मागणी संबंधि निर्णय घेण्याचे अधिकार मा. सर्वसाधारण सभेचे असल्याचे स्पष्ट केल्यानंतर असा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर केल्यानंतर त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येईल असे स्पष्ट करुन स. पदाधिकारी, स. सदस्य यांनी तसे पत्र देण्यात येईल असे नमुद केले. त्या अनुषंगाने मा. विरोधी पक्षनेता श्री प्रमोद राठोड यांनी मा. महापौर यांना सुचक/अनुमोदक म्हणुन स. सदस्य/स. पदाधिकारी यांचे स्वाक्षरीने पत्र देऊन तसा प्रस्ताव सादर करता मा. महापौर यांनी त्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात येईल, पुढील कार्यवाही करण्यात यावी असे साक्षाकिंत करुन पत्र मा. आयुक्त यांना पुढील कार्यवाहीस्तव दिले. त्या संबंधाने पुढील कार्यवाहीमध्ये वरील मागणीस भाडे दराबाबत महानगरपालिका जे काही दर निश्चित करेल ते मान्य राहील अशी जोड देऊन शपथपत्र मसुदा सुधारीत करण्याचे मान्य करुन सिल उघडण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

हया वर प्रस्तावित सर्व कार्यवाहीस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता असणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे. कृपया सदर प्रस्तावास मान्यता व्हावी.

दरम्यान वर नमुद केल्या प्रमाणे सिल केलेल्या दुकानांपैकी सिल केलेल्या सर्व दुकानांचे वरील कार्यवाही नुसार संबंधित गाळेधारकांनी दिलेल्या शपथपत्रा आधारे सिल उघडुन देण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याने त्यास मा. महापौर यांचे दि. ०६/०७/२०११ चे पत्रा संबंधाने कार्योत्तर मान्यता व्हावी.

या कार्योत्तर मान्यतेबाबतचे प्राप्त पत्र हे प्रशासनाचे दृष्टीने मंजूर ठराव/धोरणात्मक निर्णया इतकेच असल्याने त्या अनुषंगाने महानगरपालिकेकडुन सिल उघडुन देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने खालील बाबींनाही कार्योत्तर मान्यता व्हावी.

संबंधित गाळेधारकाने रक्कम रु. १००/- चे मुद्रांकावर दिलेल्या शपथपत्राधारे दुकानाचे सिल उघडण्यात यावे.

मुळ गाळाधारक/पोटभाडेकरु यापैकी आज ज्याचा ताबा आहे त्या दोहो पैंकी जो शपथपत्र देत आहे त्याचे कडुन वरील प्रमाणे शपथपत्र घेऊन पोटभाडेकरु असला तरी त्याचे शपथपत्र ग्राहय धरुन दुकानाचे सिल उघडण्यात यावे.

संबंधित गाळेधारकांकडून त्यांच्या शपथपत्रात नमूद मागणीनुसार ज्या ठिकाणी व्यापारी संकुल पाडून भविष्यात तेथे नव्याने व्यापारी संकुल बांधतेवेळी तेथे त्यांना आता त्यांचे ताब्यातील दुकान क्षेत्रफळा एवढे क्षेत्र नव्या व्यापारी संकुलात प्राधान्याने देण्यात यावे.

महानगरपालिका ठरवेल त्यानुसार नव्याने करारनामा संबंधिताकडुन करुन घेण्यात यावा.

महानगरपालिका ठरवेल त्यानुसार भाडे रक्कम संबंधिताकडून घेण्यात यावे.

प्रस्ताव मान्यतेनंतर

१. पुढील कालावधी करीता ज्या व्यापारी संकुलातील दुकाने भाडेपट्टयावर द्यावयाची आहे त्या दुकानांचा जाहीर लिलाव (खुल्या बोलीने) करण्याऐवजी स.पदाधिकाऱ्यांच्या बैठकीतील निर्देशानुसार सध्याच्या गाळेधारकांना, भोगवटाधारकांना पुढील कालावधीसाठी गाळे भाडेपट्टयाने देणेबाबत संबंधिताकडुन मा. सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार नव्याने भाडे आकारणे व पुढील कालवधी करीता नव्याने करारनामा करण्यात येईल. प्रारुप करारनामा त्यातील अटी शर्तीच्या मान्यते संबंधाने सोबत सादर केला आहे. त्यास मान्यता व्हावी. प्रारुप मान्यतेनंतर संबंधित दुकानधारकाकडुन करारनामा कार्यवाही करुन घेण्यात येईल.

२. वर नमुद ६ प्रकल्पपुर्तीच्या दृष्टीने प्रकल्प नियोजन, निधी उपलब्धता, आवश्यक त्या सर्व कागदपत्राची व कायदेशीर बाबींची पुर्तता करणे, बांधकामाच्या निविदा व इतर तत्सम अनुषंगीक सर्व समावेशक कार्यवाही करण्यात येऊन महानगरपालिका उत्पन्न वाढीचा कायमस्वरुपी स्त्रोत स्थापित करण्याच्या दृष्टीने प्रकल्प पुर्ण करण्याचे नियोजन आखण्यात येईल.

मा.महापौर :दुरूस्तीसह मंजूर.

ठराव:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेस कायमस्वरुपी मिळणारे उत्पन्नवाढीचे स्त्रोत स्थापित करण्याचे दृष्टीकोनातून व्यापारी संकुलातील मुलभुत सेवासुविधांच्या अभावामुळे निर्माण झालेल्या समस्या इ. विचारात घेऊन अशा ठिकाणी जुने पडावयास आलेले बांधकाम, व्यापारी

संकुल तोडुन नव्याने सर्व सेवासुविधा युक्त, आधुनिक स्वरुपाचे नियोजनाआधारे केलेल्या बांधकामामुळे अधिकचा रोजगार व जागा उपलब्ध होऊन मनपाच्या उत्पन्नात भरीव वाढ करणारे प्रकल्प राबविण्यासाठी प्रस्तावात नमुद केलेले अ.क्र.०१ ते ०६ या ठिकाणचे व्यापारी संकुल पाडून नविन व्यापारी संकुल बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

दरम्यान प्रस्तावात सविस्तर नमुद केल्या प्रमाणे सिल केलेल्या दुकानांपैकी सिल केलेल्या सर्व दुकानांचे वरील कार्यवाही नुसार संबंधित गाळेधारकांनी दिलेल्या शपथपत्रा आधारे सिल उघडुन देण्याच्या कार्यवाहीस व त्या अनुषंगाने खालील बाबींना कार्योत्तर मान्यता देण्यात येते. संबंधित गाळेधारकाने रक्कम रु. १००/- चे मुद्रांकावर दिलेल्या शपथपत्राधारे दुकानाचे सिल उघडण्यात यावे.

मुळ गाळाधारक/पोटभाडेकरु यापैकी आज ज्याचा ताबा आहे त्या दोहो पैंकी जो शपथपत्र देत आहे त्याचे कडुन वरील प्रमाणे शपथपत्र घेऊन पोटभाडेकरु असला तरी त्याचे शपथपत्र ग्राहय धरुन दुकानाचे सिल उघडण्यात यावे.

संबंधित गाळेधारकांकडून त्यांच्या शपथपत्रात नमूद मागणीनुसार ज्या ठिकाणी व्यापारी संकुल पाडून भविष्यात तेथे नव्याने व्यापारी संकुल बांधतेवेळी तेथे त्यांना आता त्यांचे ताब्यातील दुकान क्षेत्रफळा एवढे क्षेत्र नव्या व्यापारी संकुलात प्राधान्याने देण्यात यावे.

महानगरपालिका ठरवेल त्यानुसार नव्याने करारनामा संबंधिताकडुन करुन घेण्यात यावा. महानगरपालिका ठरवेल त्यानुसार भाडे रक्कम संबंधिताकडून घेण्यास आणि पुढील कालावधी करीता ज्या व्यापारी संकुलातील दुकाने भाडेपट्टयावर द्यावयाची आहे, त्या दुकानांचा सध्याच्या गाळेधारकांना, भोगवटाधारकांना पुढील कालावधीसाठी गाळे भाडेपट्टयाने देणेबाबत संबंधिताकडुन मा.सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार नव्याने भाडे आकारणे व पुढील कालवधी करीता नव्याने करारनामा करण्यास तसेच सोबत सादर केलेल्या प्रारुप करारनामा व त्यातील अटी शर्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. ४२४:</u>

कार्यकारी अभियंता वार्ड इ व फ महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करित आहेत की, वार्ड क्र. ६६ येथे विद्युत व्यवस्था करणे व सेशोभिकरण करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०१० ते २०११ च्या दर सुची नुसार सदर कामाचे रक्कम रु. ४९९५८८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आहे असुन सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली आहे.

सदर प्रस्ताव हा शिवशंकर कॉलनी येथील चौकात नागरीकां मार्फत तानाजी मालुसरे यांचा पुतळा बसविण्यात आला आहे. सध्या अस्तित्वात असलेला चबुतरा नष्ट करुन नव्याने उभारणी करणे व सुशोभिकरण करणे असल्याने धोरणात्मक निर्णय घेणे योग्य असल्याने सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

<u>ठराव:</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवशंकर कॉलनी येथील चौकातील तानाजी मालुसरे यांच्या पुतळयाचा अस्तित्वात असलेला चबुतरा नष्ट करुन नव्याने उभारणी करणे व सुशोभिकरण करणेस मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.४२५:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्रीमती आवदे संगिता चंद्राशेखर हया पिंर पिंपळगांव, जालना जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका म्हणुन कार्यरत आहेत. त्यांनी बदली औरंगाबाद महानगरपालिकेत करण्यासाठी जालना जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव पारीत करण्यांत आलेले आहे. तसेच त्यांनी या संदर्भाने औरंगाबाद महापालिकेस पत्रव्यवहार सुध्दा केलेला आहे. तसेच त्या औरंगाबाद येथील रहिवाशी असून त्यांच्या मुलांचे शिक्षण देखील औरंगाबाद येथे चालु आहे. त्यांना शासनाच्या निर्णयानुसार पती पत्नी एकत्रिकरण अंतर्गत आपल्या औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षिका म्हणुन समावुन घेण्याकरिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.सुनिता सुनिल सोनवणे अनुमोदक :श्री.अशोक किसनराव बेहडे,
श्री.अनिल जैस्वाल

मा.महापौर : प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती आवदे संगिता चंद्राशेखर पिंर पिंपळगांव, जालना जिल्हा परिषद हयांना पती पत्नी एकत्रिकरण अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षिका म्हणुन समावुन घेण्याच्या प्रस्तावावर प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.४२६:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.८४ मधील विजयनगर या सर्वे क्र. ५१ मध्ये महानगरपालिकेचे उद्यान आहे. या उद्यानास राज माता आहिल्याबाई होळकर असे नांव देण्यात यावे. या करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र अनुमोदक :श्री.संजय केनेकर,श्रीमती करीमुन्नीसा जमील खान

ठराव:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८४ मधील विजयनगर या सर्वे क्र. ५१ मधील महानगरपालिकेचे उद्यानास राज माता आहिल्याबाई होळकर असे नांव देण्यास मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.४२७:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद मनपा हद्दितील वार्ड क्र.४३ मधील अरफात कब्रस्तान शेजारील अंदाजे ०६ वार्डातील रहिवासीयांचे अंत्यविधी याच कब्रस्तान मध्ये होत असुन पुर्वी या कब्रस्तानात भिंत बांधुन काही जागा अत्यंविधी पुर्वी केले जाणारे विधीसाठी राखुन ठेवण्यात आलेली होती. परंतु सध्या या कब्रस्तानात जागा अपुरी होत असल्याने सदरील भिंत पाडुन जागा रिकामी करणे अत्यंत गरजेचे झालेले आहे. सदरील भिंत पाडण्याची परवानगी संबंधित विभागास देण्यासाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्रीमती करिमुन्नीसा जमील खान अनुमोदक :श्री.शेख अब्दुल असद, डॉ.खान जफर अहेमद

श्री.त्र्यंबक तुपे :ही जागा महानगरपालिकेची आहे काय?ताबा आहे काय? नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

मा.महापौर :सहाय्यक संचालक नगर रचना यांनी सदर ठिकाणी पाहणी करावी व प्रशासनामार्फत प्रस्ताव ठेवण्यात यावा.

ठराव:

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सहाय्यक संचालक नगर रचना यांनी सदर ठिकाणी पाहणी करण्यास व प्रशासनामार्फत प्रस्ताव ठेवण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.४२८:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२३ मसनतपुर, सावित्री बाई फुले नगर, चिकलठाणा येथे ५० टक्के पेक्षा जास्त कुटूंब हे अनुसूचित जातीचे आहेत. तसे प्रमाणपत्रही प्राप्त असून सोबत जोडण्यात येत आहे.

वार्डामध्ये अनेक समस्या असून नागरीकांना सुविधा मिळत नाही. नागरीकांना सुविधा मिळणेसाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रु.१५.०० लक्ष व रस्ते खडीकरणासाठी र.रु.१०.०० लक्ष असे एकूण र.रु.२५.०० लक्षचा निधी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेण्यात यावा व तसा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यांत येत आहे.

सुचक :श्री.संजय चौधरी, अनुमोदक :श्री.सुर्यकांत जायभाये

ठराव:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२३ मसनतपुर, सावित्री बाई फुले नगर, चिकलठाणा येथे ५० टक्के पेक्षा जास्त कुटूंब हे अनुसूचित जातीचे असुन नागरीकांना सुविधा मिळणेसाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेस र.रु.१५.०० लक्ष व रस्ते खडीकरणास र.रु.१०.०० लक्ष असे एकूण र.रु.२५.०० लक्षचा निधी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेण्यास व तसा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.४२९:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२३ मसनतपुर, चिकलठाणामधील आठवडी बाजार शेजारी असलेल्या हनुमान चौक जालना रोड येथील शौचालय बंद / नादुरुस्त अवस्थेत आहे. आजुबाजूला दुर्गंधी पसरलेली असून ये -जा करणाऱ्या नागरीकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

करीता वार्ड क्र. २३ अंतर्गत असलेले हनुमान चौक जालना रोड येथील बंद / नादुरुस्त अवस्थेत असलेले शौचालय तोडून त्याठिकाणी नविन पध्दतीचे सुलभ शौचालय बांधण्यात यावे. यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.संजय चौधरी, अनुमोदक :श्री.सुर्यकांत जायभाये

ठराव:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२३ मसनतपुर, चिकलठाणामधील आठवडी बाजार शेजारी असलेल्या हनुमान चौक जालना रोड येथील येथील बंद / नादुरुस्त अवस्थेत असलेले शौचालय तोडून त्याठिकाणी नविन पध्दतीचे सुलभ शौचालय बांधण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.४३०:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.९५ पद्मपुरा भागातील केसरसिंगपुरा येथील न.भु.क्र.१८२३५/१ संत तुकाराम वस्तीगृहा जवळील खुली जागा ही मिळकत मनपाची असून सदरील भाग स्लम आहे, या भागातील रहिवासीयांच्या सुविधेसाठी महानगरपालिकेतर्फे

सदरील जागेवर मंगल कार्यालय बांधण्यांत यावा जेणेकरुन गरीब रहिवासी यांना या मंगल कार्यालयाचा उपयोग होईल.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.सुनिता भारत बरथुने अनुमोदक : श्री.तुपे त्रिंबक गणपतराव

संवाद :

श्री.त्रिंबक तुपे :या प्रस्तावात सुचक किंवा अनुमोदक म्हणून श्री.विजय वाघचौर यांचे नांव टाकण्यात यावे विषय मंजुर करावा.

श्री.गजानन बारवाल :ही जागा महानगरपालिकेने विकत घेतली आहे. महापालिकेचा ताबा आहे. लवकरच प्रस्ताव करुन तेथे तार कंपाऊड करण्यात यावी.

श्री.त्रिंबक तुपे :चांगल्या स्पॉटवर जागा आहे. तेथे कमर्शियल सभागृह व शाळेचे एकत्रित नियोजन केल्यास महानगरपालिकेचा फायदा होईल व त्या जागेचा चांगला विकास होईल याचा विचार त्या ठिकाणी करण्यात यावा.

मा.महापौर :हा विषय मंजुर करण्यात येतो. तेथे तार कंपाऊड करण्यांत यावे व प्रस्तावात सुचक म्हणून श्री.विजय वाघचौरे यांचे नांव टाकण्यात यावे.

ठराव:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.९५ पद्मपुरा भागातील केसरसिंगपुरा येथील न.भु.क्र.१८२३५/१ संत तुकाराम वस्तीगृहा जवळील खुली जागेवर मंगल कार्यालय व कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधणे, तसेच सदरील जागेवर तार कंपाऊड करण्यास व प्रस्तावा मध्ये सुचक म्हणून श्री.विजय वाघचौरे यांचे नांव टाकण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.४३१:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, लेखा शिर्षक बदलणे बाबत

१) पान क्र. GBR -A-६ स्मशान भुमी विकास अ.क्र. ५ वार्ड क्र. १० मध्ये स्मशान भुमीची विविध कामे करणे : ०५.०० लक्ष

या कामा ऐवजी खालील प्रमाणे सुधारीत काम करणे

१) टाऊन हॉल उडान पुला खाली नागरीकांच्या मागणी नुसार बेगम पुरा पोलीस चौकी बाधुण देणे २.५० लक्ष
२) वार्ड क्र.१० विविध ठिकाणी कॉक्रीट करणे २.५० लक्ष

सुचक : श्री.अशोक किसनराव बेहडे अनुमोदक :श्री.कृष्णा सांडूजी बनकर

ठराव:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यात येते

१) पान क्र. GBR -A-६ स्मशान भुमी विकास अ.क्र. ५ वार्ड क्र. १० मध्ये स्मशान भुमीची विविध कामे करणे : ०५.०० लक्ष

या कामा ऐवजी खालील प्रमाणे सुधारीत काम करणे

१) टाऊन हॉल उडान पुला खाली नागरीकांच्या मागणी नुसार बेगम पुरा पोलीस चौकी बाधुण देणे २.५० लक्ष
२) वार्ड क्र.१० विविध ठिकाणी कॉक्रीट करणे २.५० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.४३२:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन ११-१२ अर्थसंकल्पात पान क्र. ४८ अनु क्र.१ वर नमुद वार्ड क्र. ६९ त्रिमुर्ती चौक येथील रस्त्यावरील डि.पी. स्थलांतरीत करणे रु. ५.०० लक्ष हया ऐवजी उल्का नगरी येथील खुली जागा विकसीत करणे हे काम करण्यांत यावे व तसा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मान्य करावा ही विनंती.

सुचक :श्री.सुरेंद्र मा. कुलकर्णी अनुमोदक :श्री.त्र्यंबक गणपत तुपे, श्री.अनिल जैस्वाल

ठराव:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन ११-१२ अर्थसंकल्पात पान क्र. ४८ अनु क्र.१ वर नमुद वार्ड क्र. ६९ त्रिमुर्ती चौक येथील रस्त्यावरील डि.पी. स्थलांतरीत करणे रु. ५.०० लक्ष हया ऐवजी उल्का नगरी येथील खुली जागा विकसीत करणे हे काम करण्यांस मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.४३३:

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.वरखेडेश्वरी चॅरिटेबल ट्रस्ट, औरंगाबाद यांनी मो.जयहिंद कॉलनी येथील सिटी मार्वल येथील हॉल भाडे पट्टयावर देण्यास प्रशासनाची मंजूरी मिळालेली आहे. सदर हॉलचे भाडे आकारणीसाठी प्रकरण मा.स्थायी समिती सभा विषय क्रमाक ४४७, दिनांक २३/०२/२०१० प्रमाणे स्थायी सभेत चर्चा होऊन ठराव झाला आहे की, मो.जयहिंद कॉलनी या भागात आजुबाजूच्या परिसरातील भाडे दराचा विचार करुन भाडे आकारणी करावी, यास रितसर मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मंजूरीनुसार उपआयुक्त(सिडको) यांनी आजुबाजूच्या परिसरातील दराची तपासणी करून सदरील भाडे दर रूपये ७८/- (प्रती चौ.मी प्रती महा) मासिक भाडे दर रूपये ९२७०/- दर निश्चित करून मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद याचेकडे मंजूरीस्तव ठेवले असता मा.आयुक्त महोदय यांनी मंजूरी देऊन सदर दरास मा.स्थायी समितीच्या समोर विचारार्थ व मंजूरीस्तव ठेवावा असे आदेशित केले. त्यानुसार मा.उपआयुक्त (सिडको) यांनी दिनांक २९.०४.२०११ रोजीच्या मा.स्थायी समितीमध्ये विषय क्रमांक २६० नुसार प्रशासकीय ठरावास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळालेली आहे.

त्यानुसार संबधीत विभागाने संस्थेस जा.क्र./मनपा/मामअ/११८३/२०११, दिनांक २०.०६.२०११ रोजी अनामत एकुण वार्षिक भाडे व अकृषी कर सेवा शुल्क असे एकुण रूपये २,३०,५२१/-चा भरणा करणेसाठी व भाडेपट्टा करारनामा करण्यासाठी पत्राने कळविले होते. त्याबाबत संबधित संस्थेने दिनांक २३/०६/२०११ रोजी संस्थेने सदरील हॉलसाठीचे एका वर्षाचे भाडे रूपये १,११,२४०/- व अनामत रक्कम रूपये १,११,२४०/- सेवा शुल्क रूपये ६,१२८/- आणि अकृषीक कर रूपये ९१३/- रूपये असे एकुण रूपये २,३०,५२१/-चा भरणा करण्यासाठी संस्थेने विजया बँक, शाखा औरंगाबादचा धनादेश क्रमांक ४३५८०४ द्वारे भरणा केलेली आहे.

तरी आज महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करून ती सुधारण्यासाठी असे आर्थिक सक्षम निर्णयास लवकरात लवकर प्रशासनाकडुन कार्यवाही व्हावी.

करीता प्रशासनाने व मा.स्थायी समितीने मंजूरी दिलेल्या ठरावाप्रमाणे श्री.वरखेडश्वरी चॅरिटेबल ट्रस्ट, औरंगाबाद यांनी प्रशासनाच्या अटी व शर्तीनुसार सर्व प्रक्रीयेची कार्यवाही पुर्ण केलेली असुन अद्यापपर्यत हॉल ताब्यात मिळालेला नाही तरी सदरील हॉल संबधीत संस्थेला

आज रोजी ताब्यात देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सूचक:श्री. विजय वाघचौरे, श्रीमती.रेखा जैस्वाल अनुमोदक:श्री.किशोर नागरे,श्री.विरभद्र गादगे

ठराव:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.वरखेडश्वरी चॅरिटेबल ट्रस्ट, औरंगाबाद यांना मो.जयहिंद कॉलनी, सिटी मार्वल येथील हॉल नियमानुसार भाडेभट्टयावर ताब्यात देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.४३४:

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.किशोर पंढरीनाथ राठोड यांची मुलगी कु.दृष्टी वय ३ वर्ष ही कर्णबधीर असुन तिच्या कानाची सर्व तपासण्या हॉस्पिटल, मुंबई येथे केल्या आहेत. तिला ऐकु येण्यासाठी तिची क्लाक्लिअर इम्लांट सर्जरी करावी लागत असुन त्यास एकुण ६,३०,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. श्री.किशोर पंढरीनाथ राठोड यांना सुध्दा दोन्ही पायांचा Avascular Necrosis हा आजार असुन २ वर्षापासून उपचार चालु आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची आहे.

करीता त्यांनी विनंती अर्ज देवून कळविले आहे की, हिंदुजा हॉस्पिटल मुंबई येथे मुलीच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थीक मदत देण्यात यावी. तरी कु.दृष्टी हिच्या शस्त्रक्रियेसाठी रक्कम रु. १ लक्ष मनपाने देण्यासाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.सावित्री हिरालाल वाणी अनुमोदक : श्री.मनिष चंद्रकांत दहिहंडे

ठराव:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.किशोर पंढरीनाथ राठोड यांची मुलगी कु.दृष्टी वय ३ वर्ष ही कर्णबधीर असुन तिच्या कानाची क्लाक्लिअर इम्लांट सर्जरी करावी लागत असुन त्यास एकुण ६,३०,०००/- एवढा खर्च अपेक्षित असून हिच्या शस्त्रक्रियेसाठी रक्कम रु. १ लक्ष आर्थिक मदत महानगरपालिकेने नियमाप्रमाणे देण्यास मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

प्रश्नोत्तरे

श्री.राजू शिंदे :प्रश्न क्र ५८ नुसार गरवारे क्रिडा संकुल जलतरण तलावा संदर्भात माहिती विचारली होती उत्तर मिळाले नाही सिडको हस्तांतरीत झाले तेंव्हा त्या भागात २ ते २.५० लक्ष नागरीक असतील.या भागात विकासासाठी १८ कोटी त्यात रस्ते,ड्रेनेज, लाईट,पाणी, गार्डन व जलतरण तलाव यासाठी सिडकोकडून मिळाले होते गरवारे क्रिडा संकुल तलावाचे काम अर्धवट आहे तेथे ८-१० फुट पाणी साचले जीवीत हानी होवू शकते काम पुर्ण करणार की नाही.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे):या बाबतची माहिती मा सभापती स्थायी समिती कार्यालयात दिली आहे.सदरील कामाबाबतचे कार्यादेश दिनांक ११-५-२००७ अन्वये देण्यात आले संबधीत गुत्तेदाराकडून मुख्यजलतरण तलाव ,बेबी पुल, बॅलेसींग टँकचे आरसीसीचे कामे पुर्ण करून घेतले महापालिकेच्या .आर्थीक परीस्थितीमूळे तत्कालीन आयुक्त यांचे दिनांक २-८-२००८ च्या आदेशानुसार ८-१० महिणे काम बंद होते.संबधीत गुत्तेदाराचे पेमेंन्ट वेळेवर दिले नाही त्यामुळे वेळेत काम झाले नाही.त्यानंतर सदर प्रकल्प

बीओटीवर करण्या बाबत तत्कालीन महापौर यांनी दिनांक १-२-२०१० च्या पत्रानुसार कळविले त्यावेळी सिडकोचे सदस्यांनी देखिल काम तात्काळ करण्याची मागणी केली आर्थीक परीस्थिती व मा.महापौर यांचे आदेशानुसार हा प्रकल्प बीओटीवर करण्या बाबत निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली मध्यतंरीच्या काळात हे काम बीओटीवर न करता महापालिकेच्या फंडातून करावे असा २६-४-२०१० च्या सभेत निर्णय घेतला जी निविदा प्रक्रिया होती ती स्थगित केली

श्री.काशिनाथ कोकाटे :हस्तांतरणाच्या वेळी सिडकोच्या काही मालमत्ता, ओपनस्पेस व १५ कोटी रूपये मिळाले त्यात जलतरण तलाव ,बॉटनिकल गार्डन व इतर कामाचा उल्लेख होता असे असतांना बीओटीवर करण्याचा नंतर महापालिकेने करण्याचा निर्णय झाला होता खुलासा दिला जातो दिशाभूल कुणी करू नये १५ कोटीमध्ये बॉटॅनिकल गार्डन व गरवारे येथे जलतरण तलाव करण्याचे नमूद होते,काम का झाले नाही.हे उत्तर अपेक्षीत आहे.बीओटीवर की महापालिकेने करावे कोणत्या बैठकीत झाले इतिवृत्त दाखवावे चुकीची माहिती देवू नये या तलावामुळे सर्वसमान्य नागरीकांना फायदा होणार होता ते आज त्यापासून वंचीत आहे. काम करायचे नव्हते तर करारनामा का केला , करारनामा नुसार अमलबजावणी करावी नसता आंदोलन होतील.

श्री.महेश माळवंकर :हस्तांतर केले तेंव्हा या भागात जलतरण तलाव बॉटनिकल गार्डन रस्ते विकसीत करणेचे आश्वासन दिले, तीनही कामे पुर्ण झाले नाही जलतरण तलाव का झाला नाही उत्तर मिळत नाही बॉटनिकल गार्डनची परीस्थिती वाईट आहे.५० कोटीचे डिफर पेमेंन्टवर रस्ते घेत असतांना लिमन्ट्री हॉटेल ते हर्सुल टि पॉईटचा रस्ता त्यातून जाणीवपुर्वक वगळला आम्ही सतत या कामाची मागणी करत होतो वेगळी माहिती देवून सिडकोच्या नागरीकांना यापासून वंचित ठेवू नये.बॉटॅनिकल गार्डनची परीस्थिती वाईट मा.आयुक्तांनी पाहणी करावी जलतरण तलावाचे काम केंव्हा पुर्ण होणार तेही सांगावे इतर विकास कामासाठी निधी असतो सिडकोच्या प्रोजेक्टसाठी निधी नसल्याचे सांगितले जाते हे योग्य नाही.जलतरण तलाव व बॉटॅनिकल गार्डचे काम तात्काळ कसे होईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे. सेन्ट्रल नाका ते टीव्ही सेन्टर तेथून सलीम अली सरोवर पर्यंच्या रस्त्याचे काम पुर्ण का होत नाही खुलासा करावा.

श्री.राजू शिंदे :सिडको हडको भागातील कर मोठया प्रमाणात येतो अशा भागावर अन्याय होत असेल तर योग्य नाही.जलतरण तलावावर किती पैसे खर्च केले कुणी खर्च केले.

कार्य.अभियंता(पापू) :आतापर्यंत या कामावर ७८.२२ लक्ष खर्च केले निविदा अटी शर्तीनुसार संबधीताचे २३ टक्के महापालिकेकडे रोखून ठेवले १८ लक्ष जमा आहे ६८ लक्षचे पेमेंन्ट संबधीतास केलेले आहे.

श्री.राजू शिंदे :७० लक्ष पेमेंन्ट केले २३ टक्के राखून ठेवले माझ्या माहिती प्रमाणे त्यावर व्याज चालू आहे.बीओटीवर करण्याचे का ठरल होते.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे):२३ टक्के रक्कम ठेवली काम पुर्ण झाल्यावर ती देणार महापालिकेलाच व्याज मिळते.सध्या ठेकेदार काम करण्यास तयार नाही निधी नाही त्यामूळे बीओटीवर करण्याचे ठरविले होते.

श्री.काशिनाथ कोकाटे :गरवारे येथील तलावाची निविदा काढून काम झाले नाही ज्योतिनगर येथील नंतर काम झाले सिडकोचे आलेले पैसे कुठे खर्च केले.७० लक्ष खर्च केले ६ वर्ष झाले काम पुर्ण का झाले नाही.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे)सर्वसाधारण सभेच्या आदेशामुळे स्थगित झाले.

मा.उपमहापौर :शासनाने या भागासाठी विशेष अनुदानही दिले होते.७० लक्ष पेमेन्ट देवून सुध्दा जलतरण तालवाचे तेथील काम झाले नाही दोन सुरक्षा रक्षकाचे पेमेन्ट देतो येणा-या सभेत प्रशासनाला वाटत असेलेले प्रपोजल तसेच त्यासाठी लागणारा फंड या बाबत प्रस्ताव यावा लवकरात लवकर ते काम करावे.

श्री.राजू शिंदे :येणा-या सभेत हा प्रस्ताव प्रशासनाने ठेवावा सभागृह निर्णय घेईल जागा असेल गाळे असेल कोणतीही लीज ३० वर्षापेक्षा जास्त नसावी.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे):येणा-या बैठकीत योग्य वाटेल तसा प्रस्ताव दिला जाईल.

मा.महापौर :येणा-या सर्वसाधारण सभेत सविस्तर असा प्रस्ताव ठेवावा.

सौ.प्राजक्ता भाले :बॉटनिकल गार्डनसाठी २ कोटी खर्च केले तेथे गट्टू उखडलेले दिसतात.कोणतीही सुविधा नाही. दोन वॉचमन दयावे मागणी केली दिले नाही कोणीही तेथे जातात येतात, वाईट प्रकार तेथे घडतात एका प्रकारत पोलीस केस झाली. सिडकोकडून आलेला निधी कुठे खर्च केला अनेकदा विचारणा केली माहिती मिळाली नाही किती दिवसात काम सुरू होईल खुलासा घ्यावा.

श्री.प्रमोद राठोड :प्रश्न क्र ६२ नुसार जालना रोड बाबा पेट्रोल पंप ते चिकलठाणा पर्यतच्या रस्त्यावरील किती इमारतीचा परवानगी दिली कितींना भोगवटा प्रमाणपत्र दिले व किती संचिका याच्या गहाळ झाल्या अशी माहिती प्रश्न देवून विचारली होती उत्तर दिले या रस्त्यावरील किती संचिका गहाळ झाल्या याची माहिती नगररचना विभागाकडे नाही या रस्त्यावर १११ इमारतीचा परवानगी दिली व १२ इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र दिल्याचे म्हटले हे विचारण्या मागे असे की पार्कींगची मोहिम सुरू केली होती त्या संचिका नगररचना विभागाकडे मिळाल्या त्या संचिका बघीतल्या त्यात पार्कींग बरोबर आहे की नाही बघीतले व पार्कींग काढण्याची कार्यवाही सुरू केली याचा अर्थ त्यांचेकडे ज्या संचिका उपलब्ध आहे त्याप्रमाणे कार्यवाही करायची ज्या संचिका गहाळ आहे त्यांचेवर कार्यवाही होत नाही.संचिका गळाळ असेल तर पुढे तक्रार दयायला पाहिजे नसता कुणीही इलिगल बांधकाम करेल व संचिका घेवून जाईल.

सहा.संचालक(न.र) :१-१-२००९ पूर्वीच्या संचिका रेकॉर्ड विभागाकडे आहे.अस्थापना विभाग याचे प्रमुख आहे.

श्री.प्रमोद राठोड :यापूर्वी मा.आयुक्तानी म्हटले होते अभिलेख विभागचा इंचार्ज हा त्या त्या विभागाचा विभाग प्रमुख असतो कपाटमध्ये कोणत्या संचिका आहे याची नोद त्यांचेकडे असली पाहिजे.मी काय पाठवले हे जर विभाग प्रमुखांना माहित नसेल तर तो विभागप्रमूख कसा होवू शकतो, कपाटमध्ये ३ संचिका असेल तर त्यांची नोंद असायला पाहिजे की कोणत्या संचिका पाठविल्या यांची यांचेकडे नोंद नाही का २००९ पुर्वीच्या संचिका रेकॉर्ड पाठविल्या सांगतात म्हणजे काय,याची नोंद संबधीत विभागाकडे का नाही ,यास जबाबदार कोण आहे.

सहा.संचालक न.र :जो प्रश्न होता त्याचे उत्तर ८ दिवसाच्या आत दिले जाईल.

श्री.प्रमोद राठोड :उत्तर मिळावे, दोन महिण्यापुर्वी प्रश्न विचारला,गहाळ संचिका बाबत काय कार्यवाही करणार मा.आयुक्तांनी खुलासा करावा.ब-याच संचिका या विभागातून गहाळ असल्याचे स.सदस्य बोलतात यास जबाबदार कोण आहे.कार्यवाही काय करणार आहे.

श्री.त्रिंबक तुपे :नगररचना विभागाच्या संचिकाच का गहाळ होता.

श्री.प्रमोद राठोड :ज्या संचिका आहे त्याचपार्कीग काढण्यात आले ज्या गहाळ आहे त्या बाबतीत कार्यवाही नाही.म्हणजे त्या पार्कीग जशाच्या तशा राहतील.

श्रीमती हेमलता मुगदीया:ज्या संचिका मिळत नाही अशा इमारतीच्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर काय चुकीचे झाले त्यानुसार कार्यवाही करायला पाहिजे संचिका मिळत नाही म्हणून २०-२० वर्ष कार्यवाही थांबविणार का अनेक नागरीक या बाबतीत तक्रारी देतात काही ठिकाणी ५-५,१०-१० फुट पार्कीगच्या जागेत पाणी आहे. केंव्हा कार्यवाही होणार,पार्कीग काढण्याची कार्यवाही सुरू होते पुनहा का थांबली जाते कुणामूळे थांबविली जाते.कागदपत्र नसतील तरी इमारत बधीतल्यानंतर कोणते काम इलिगल झाले लक्षात येते त्यानुसार कार्यवाही का होत नाही. प्रत्येक नागरीकानी दाद मागण्यासाठी कोर्टात जायचे हाच पर्याय ठेवणार का?

श्री.प्रमोद राठोड :माहिती दिली त्यात रघुवीर मोटार्स ,आयडीबीआय बँकने आलकनंदा नागपाल कन्स्ट्रक्शन लि. यांनी १९९८ परवानगी घेतली १११ इमारतींना परवानगी दिली परंतु भोगवटा प्रमाणपत्र घेतले की नाही विभागाला माहित नाही.तर मालमत्ता कर व इतर कर कशाच्या अधारे आकारले जातात.या सर्वांची नोंद का नाही.

मा.आयुक्त :मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या पार्श्वभुमीवर पार्कीगच्या जागेवर अनधिकृत वापर होतो ते काढणे आवश्यक होते पुर्वी जी माहिती मला दिली त्यानुसार १६५ पार्कीग आहेत त्यापैकी १४४ काढल्या व २१ बाकी आहे. अशी माहिती माझ्याकडे दिली होती पदाधिका-या मार्फत अनेक तक्रारी आल्या तेंव्हा असे लक्षात आले की,जे काढले त्याची माहिती तयार केली होती तेथे पुन्हा अनधिकृत वापर होत होता.म्हणून

काही दिवसापूर्वी अनिधकृत पार्कींग काढून टाकाव्या, आदेशीत केले. दोन महिण्यापासून पाठपुरावा करण्यात आला. कोणत्या रस्त्यावर किती इमारतींना परवानगी दिली याची माहिती असणे नगररचना विभागाची जबाबदारी आहे मुळात प्रश्न हा की, या सचिका कोणी सांभाळाव्या परंतु ही त्या त्या खात्याची जबाबदारी असते. कोणत्या संचिका विभागात आहे त्याचे वर्गीकरण करायला पाहिजे की कोणती संचिका कायमस्वरूपी ,काही संचिका कायमस्वरूपी तर काही ३० ,१०,०५ तर काही १ वर्षासाठीच्या असतात ABCD प्रमाणे लिस्ट असते.आणि दरवर्षी या संचिकेचा नोंदी घ्यायच्या असतात ,वर्गीकरण करून रेकॉर्डला गेल्या पाहिजे प्रत्येक विभागाच्या कोणत्या संचिका गेल्या त्याची लिस्ट असायला पाहिजे.विभागा प्रमुखाने सर्टीफाय केले पाहिजे की या वर्षाच्या इतक्या संचिका आहेत. हे दरवर्षीचे काम आहे.दरवर्षी याची सिस्टीम त्या विभाग प्रमुखानी केली पाहिजे त्याची एक प्रत रेकॉर्ड व एक प्रत त्या विभागात असावी हे दरवर्षी बघीतले पाहिजे ज्याचा कालावधी संपला त्या फाडल्या पाहिजे ज्याचा आहे त्याची तपासणी केली पाहिजे.दुर्दैवाने ही सिस्टीम कोलॅप्स झाली आहे,ज्या सापडत नाही गठ्ठयामध्ये असतील वेळ लागेल कर्मचारी लावावे व शोधाव्या असे सांगितले होते रेकॉर्ड किपर हे त्यांचे कडे जे रेकॉर्ड येईल ते रेकॉर्ड ठेवतील जर कुणी प्रत मागणी केली तर ती कोणत्या संचिकेतील ,गठ्ठयातील आहे त्यातून काढून त्याची प्रत करून देणे हे काम आहे.परंतु मुळ संचिकाचे वर्गीकरण करणे त्या रेकॉर्डला पाठविणे, मुळ रेकॉर्ड विभागाकडे ठेवणे दर वर्षी आयुक्त किंवा ज्याची आवश्यकता आहे त्यांची मान्यता घेणे ज्या संचिकेचा कालावधी संपला संपला त्या फाडून टाकणे ज्या कायमच्या आहे तपासणी करून ठेवणे अशा प्रकारे हा रेकॉर्ड असतो दुर्देवाने हे नगररचना कडून झाले नाही २ महिण्यापासून आदेशीत केले की संचिकेचा शोध घ्यावा संचिका सापडत नसेल तर कोणत्या सापडत नाही हे समोर यावे हे ही सांगण्यात आले की अनधिकृत पार्कींगच्या ठिकाणी जावे व संबधीत मालकाकडून त्याची संचिका घ्या व परवानगी कशासाठी व वापर कोणता होतो हे पहावे अशी कार्यवाही करण्याचे सांगितले तेही झाले नाही नगररचना विभागाने जी माहिती दिली ती चुकीची आहे अशी माहिती देणे बरोबर नाही त्याचा खुलासा घेतला जाइल जी संचिका हरवल्या त्याचा त्यास कोण जबाबदार आहे त्याचेवर उदयापर्यत कार्यवाही होईल.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

कार्यक्रम पत्रिका क्रमांक -(२५)
दिनांक ७-९-२०११ रोजी (१८-८-२०११ ची तहकूब सभा) आयोजित सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे

प्रश्न क्र.:- ५८

स.विरोधी पक्ष नेता स.सदस्य श्री.राजू रामराव शिंदे
उत्तर (कार्यकारी अभियंता वार्ड ब आणि क)

.

प्रश्न	उत्तर
प्रश्न क्र.:- ५८ ०१. गरवारे क्रिडा संकुल परिसरातील जलतरण तलावाचे काम बंद होण्यामागची कारणे काय आहेत? गरवारे क्रिडा संकुल परिसरातील जलतरण तलावाचे उर्वरीत काम केव्हा सुरु होईल? ०२. जलतरण तलावाच्या कामावर आतापर्यंत किती खर्च झालेला आहे? सिडको - हडकोतील नागरीकांना जलतरण तलावाची सुविधा केव्हा उपलब्ध करुन दिली जाईल? प्रशासनामार्फत काम सुरु करण्यासाठी कोणते प्रयत्न केले जात आहेत? या संदर्भातील सविस्तर माहिती येणाऱ्या सर्वसाधारण सभेत देण्यात यावी.	**सोबत जोडण्यात येत आहे**

प्रश्न क्र.५९

स.विरोधी पक्ष नेता श्री.प्रमोद राठोड
उत्तर (आरोग्य विभाग)

प्रश्न	उत्तर
१.मनपा आरोग्य विभागा अंतर्गत मागील दोन वर्षात किती औषधी खरेदी झाली आहे,औषधी खरेदी करण्याची पध्दत काय आहे?	Year 2009-2010 total purchasing rs.53,47,045 /- Mode of purchase :- Rate contract/govt firm /GR :- Rs. 51,12,625/- Quotation :- 15,000 /- Under 67 (3) c inj ARV 1000 vials :- Rs. 2,19,420 Total :- 53,47,045 /- Year 2010-2011 Total Purchesing Rs. 46,76,494/- Mode of Purchase :- Rate contract/govt firm /GR :- 32,48,516/- Quotation :- 1,11,978 /- Under 67 (3) c Rs. 5 LK Cheque deposited to GMC and ventilator cost Rs. 8,16,000/-donated to GMC for Swine Flue Patients Total :- 46,76,494/-

स.विरोधी पक्ष नेता श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
प्रश्न क्र. ६०
उत्तर (आरोग्य वैद्य. अधिकारी)

आर.सी.एच. विभागाअंतर्गत कोणकोणत्या प्रकारचे आरोग्य विषयक मागील दोन वर्षात कार्य केले गेले आहे? व आर.सी.एच.चे कार्यक्रम राबविण्यासाठी मागील दोन वर्षात किती मिटींग घेण्यांत आल्या त्यांची सविस्तर माहिती देण्यांत यावी.

(सोबत उत्तर जोडण्यात आले आहे)

Municipal Corporation, Aurangabad

D) Health Dept (RCH-2) Under Grant Received & Expenditure For the year 2008-2011

2008-2009			
Sr. No.	Particulars	Grant Received	Expenditure
1	RCH, Family Planning, JSY	-	9,703,952
2	Pulse Polio Progg.	1,669,530	-
3	Routine Immunization	-	504,353
4	School Health Progg	-	90,900
	Total	1,669,530	11,938,480

2009-2010			
Sr. No.	Particulars	Grant Received	Expenditure
1	RCH, Family Planning, JSY	7,950,000	11,390,891
2	Pulse Polio Progg.	1,664,900	1,022,900
3	Routine Immunization	2,590,955	2,575,608
4	School Health Progg	199,455	181,370
5	Matrutwa Anudan Yojana	293,800	97,200
	Total	12,699,110	15,267,969

2010-2011			
Sr. No.	Particulars	Grant Received	Expenditure
1	RCH, Family Planning, JSY	11,036,428	9,497,489
2	Pulse Polio Progg.	7,492,270	7,215,388
3	Routine Immunization	620,000	1,241,050
4	School Health Progg	41,032	1,032
	Total	19,189,730	17,954,959

RCH-2 Activities Conducted in Year 2010-11

1.Parental Iron Therapy :-

- Training of M.O. on Parentral Iron Therapy by Dr.Gaddapa dtd. 30/01/2012
- Training of M.O. on Parentral Iron Therapy by Dr.Pardeshi ,OBGY Society President
- 15 ANC Anemic patients were given Parentral Iron on the day of Hands On Training
- Training of M.O. & Staff Nurse for the Hb detection on dt.15th Oct.& 16th Oct.2010
- The total no. of ANC's received Parentral Iron therapy-254

2. Link Workers Reorinetation Cum Qtly. Meeting
   - Four Meeting were conducted during the year 2010-11
   - The LW were Sensitized by Dr.Masarat of HFWTC on Leprosy on 16th March 2011
   - A sensitization on Child Health issue by NGOChild Line On 14th & 15th March 2011
   - Link Workers are sensitized for various health programmaes in the quaretely Meeting e.g . JSY,RCH,Family Planning

3. High Risk ANC & Gynac Clinic
   - The Meeting was conducted on 28/10/2010 at data centre of all pvt.Gynacologist & Pediatrician for giving guidelines of High Risk Clinic
   - The High Risk ANC & Gynac Clinic held at 16 HP where high Risk cases like PPH,Incomplete abortion,Multipara,anemic patients were examined through Pvt.Gynacologist.
   - The Total no. of high Risk Clinics held during the year 2010-11 were -128 & the Total no. of Patients Examined :1301

4. Meta Melava
   - The Mata Melava were arranged at 8 health Centreof AMC on 9th Dec.2010.No. of Beneficaries : 589
   - Through this Mata Melava all the Participants were oriented towards various Health programmaeslike Family planning ,Immunization& JSYMaternal Health ,nutrition & Child health were the Key issues addressed
   - Two Meetings were conducted

5. Organization of Mahila Arogya Group
   - No. of Meeting 86 in feb.2011
   - No. of Meeting s 86 in March 2011

6. Pediatrician Services at HP level for Sick Children
   - The Meeting was conducetd of Pvt. Paediatrician on 28/10/2010 for giving guidelines of high risk Clinic
   - Total no. of pediatrician involved -14
   - The total no. of Clinic held during the Year 2010-11 were-128
   - The total no. of patients examined under this:1047

7. Medical Examination of Preschool Children
   - The total no. of Pediatrician involved -5
   - No. of aganwadis checked-149
   - No. of Children Examined -5812

8. Orientaion of Newly Married Couple

- The Newly Married Couple were oriented towards various methods of Family Planning, nutrition of mother,importance of early breastffeding,breastfeeding one of the contraception
- Date : 24 th Jan 2011
- No. of Camps : Total 6 Camps
- No. of Beneficiaries : 589
- The newly married females were addressed by pvt. Gynecologist & Counselor.

9. Adolescent Health- Diagnostic services for Anti Anemic drive for Hb detection & Deworming for prevention of Anemia

- 1. The Anti-Anemic Drive was carried out in 99 wards of Corporation area for School going & Non school going girls (11-19Yrs)
- The number of School going & Non school going girls undergone HB estimation & blood Gr were respectively SG- 11254,NSG-1013
- The distribution of Iron & Folic Acid Tablets & Deworming of all these girls done in the Camp

10. Adolescent Health Clinic

- Renovation & Establishment of Adolescent Clinic Room with the Help of AMC

11. Innovations/PPP/NGO 6.1 Promotion of Institutional deliveries

- This activity is basically to reduce Maternal & Child Mortality Rate which is a Goal of RCH
- The 6 Private Hospital were registered for the PPP
- Aurangabad Municipal Corporation carried out 632 deliveries in the year 2010-2011

12. Orientation of Appropriate Authorities under pc & pndt act

- The Workshop was arranged by AMC for sensitization of sonologist & Gynecologist in the Corporation area on 22nd Feb.2011
- The Total number of Doctors present for the workshop including Gynecologist & sonologist-50

13. computerization for ANC registration & Generation of MIS Data

- This activity is basically to collect data of all ANC's in the Corporation area
- Tracking of all ANC's & Child immunization doses is possible with this
- The tenders called for Computerization for ANC & agency finalized Registration-18 /12/2010, 24/12/2010

- The Training of all Medical Officers for the Onling ANC Registration on date
- The Training of all Health Staff for Online ANC training
- Presently we have 1759 ANC Registration & child Immunization doses of 873 children

14. Infrastructure & Human Resources Minor Repairs as allowed under RCH (Maternity home & HP)

- Budget transferred to AMC for Repair of Maternity Home & HP on 30/10/2010
- 23/03/2011 Repair & Maintenance of HP

15. HP Rent

- Rent for one HP is (pundlik nagar) given from RCH budget

16. Internet connectivity at HF

- Internet connection to all 27 HF for online ANC Registration

17. Celebration of Health Events celebration of World breastfeeding week

- Link Workers Sensitization on Breastfeeding on date 4/08/2010
- PHN/Staff Nurse Training on bread feeding on date 5/08/2010
- Training of All MO on breastfeeding on date 7/08/2010
- Celebration of World Womens day on 8th March 2011
- The pap Smear Camp was organized at 10 Health Facilities. The total no. of Pap Smear taken on Camp day-116

स.विरोधी पक्ष नेता श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड

प्रश्न क्र. ६१
उत्तर (आरोग्य वैद्य. अधिकारी)

प्रश्न	उत्तर
१.फॉगींग आणी पेस्ट कंन्ट्रोलचे कार्य कोठे कोठे चालू आहे त्यासाठी किती वाहने कार्यरत आहे? यासाठी टेंडर काढण्यांत आले होते का ? व याला सर्व खर्च किती लागलेला आहे याची सविस्तर माहिती देण्यांत यावी.	फॉगींग आणि पेस्ट कंन्ट्रोलचे काम एकुण निवडणुक ९९ प्रभागामध्ये काम चालू असून त्यासाठी फवारणीसाठी तीन फिरत्या फवारणी यंत्राद्वारे संपुर्ण प्रभागामध्ये दैनंदिन फवारणी करण्यात येते ते निवीदा पध्दतीने कार्यरत असून त्यासाठी साधारण तीन फवारणी यंत्रासाठी एकत्रित प्रतीमहा रक्कम रूपये ९९६६६/- एवढा खर्च येतो.तसेच व्हिकल मॉटेड फॉगिंग मशीनसाठी लागणारे वाहन महानगरपालिकेच्या मालकीचे असून ते यांत्रिकी विभागामार्फत कार्यरत आहेत.

स.विरोधी पक्ष नेता श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
प्रश्न क्र. ६२
उत्तर (सहाय्यक संचालक नगर रचना)

प्रश्न	खुलासा
मनपा हद्दितील बाबा पेट्रोल पंप ते चिकलठाणा पर्यंत रस्त्याचे दोन्ही बाजूस असलेले एकुण किती इमारती आहेत नावासहीत यादी देण्यांत यावी व त्यापैकी किती मालमत्ता धारकांना भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहेत व किती बाकी आहेत त्यांची नावासह यादी पुरविणे. सध्या मनपा हद्दीतील बाबा पेट्रोलपंप ते चिकलठाणा पर्यंत रस्त्याचे दोन्ही बाजूस असलेले इमारतीची बांधकाम परवानगीची संचिका नगर रचना विभागात उपलब्ध आहेत का ? नांवासह यादी उपलब्ध करुन देण्यांत यावी. मनपा हद्दितील बाबा पेट्रोलपंप ते चिकलठाणा पर्यंत रस्त्याचे दोन्ही बाजुस	नगर रचना विभागामार्फत बाबा पेट्रोल पंप ते चिकलठाणा पर्यंत प्राथमिक सर्व्हेक्षण केले असून सदर रस्त्यावरील इमारतींची उपलब्ध माहिती यादीसह सोबत जोडून देण्यात येत आहे. सदरील यादीमध्ये संबंधीत मिळकत धारकांना देण्यात आलेल्या बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र यांचा क्रमांक उपलब्धते नूसार देण्यात आलेला आहे. जालनारोडसाठी स्वतंत्र अभिलेख नाही. तसेच दिनांक ०१/०१/२००९ पूर्वीच्या सर्व संचिका अभिलेख कक्षात असणे अपक्षित आहे. या रस्त्यावरील किती बांधकाम परवानगी संचिका गहाळ झाल्या या बाबत माहिती नगर रचना विभागाकडे नाही.

असलेले किती इमारतीचे बांधकाम संचिका गहाळ झालेले आहे नावासह यादी पुरविण्यात यावी.	

स.विरोधी पक्ष नेता श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
प्रश्न क्र. ६३
उत्तर (उपआयुक्त (सिडको))

अ.क्र.	मुद्दे	खुलासा
१.	**प्रश्न क्र.६३** १.प्रश्न क्र.६३ सिडको एन-३ व एन-४ मधुन वाहनाच्या नाल्यावर अतिक्रमणझालेले आहेत काय? सविस्तर खुलासा करावा	सिडको एन-३ व एन-४ मधून वाहणाऱ्या नाल्यावरील अतिक्रमणे दोन्ही बाजूची कंपाउंड भिंत व संडासचे अतिक्रमणे काढण्यात आली आहेत.(दक्षिण व उत्तर बाजू) उर्वरीत अतिक्रमण रितसर काढण्याची दिनांक-९/८/२०११ रोजी मा.महापौर व मा.आयुक्त यांचेकडे झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे संचिका मार्किंग व अभिप्रायासाठी नगर रचना विभागाकडे पाठविण्यात आली आहे.

स. श्री. अशोक किसनराव बेहडे
प्रश्न क्र. ६४
उत्तर (सहाय्यक संचालक नगर रचना)

अ.क्र.	मुद्दे	खुलासा
१.	**प्रश्न क्र.६४** सिटी प्राईड व रेमंड शोरुम बाबत माहिती नगर रचना विभागाकडुन मागीतली असता अद्याप देण्यात आली नाही.	सिटी प्राईड व रेमंड शोरुम बाबत माहिती विचारली आहे. रेमंड शोरुम बाबत माहिती जा.क्र./मनपा/नरवि/नर-2 /1706/2011 दिनांक 11/08/2011 अन्वये आपणांस दिलेली आहे. तथापि सिटी प्राईड इमारती बाबत माहिती देण्यात येते की सदरील इमारत ही शासनाचे समावेश आरक्षण या तत्वावर विकसीत झालेली असून त्यानूसार 25 % भाग व त्याअनुषंगाने पार्किंग हा महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेली आहे.

स. श्री. अशोक किसनराव बेहडे
प्रश्न क्र. ६५,६६
उत्तर (सहाय्यक संचालक नगर रचना)

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१.	**प्रश्न क्र.६५** प्रभाग अ अंतर्गत नाले साफसफाईची कामे कोणाकडुन व कोणकोणत्या ठिकाणी करण्यात आली	अप्राप्त

	व किती खर्च करण्यात आला वारंवार पत्र देउन माहिती मिळाली नाही . **प्रश्न क्र.६६** गजानन मंदीर ते सुतगिरणी रोड वर जे आरक्षण उठविले आहे ते अशासकीय होते का? प्रशासकीय होते याची व अटी शर्तीची माहीती वारंवार पत्र देऊन मिळाली नाही.	अप्राप्त

स. श्री. अशोक किसनराव बेहडे

प्रश्न क्र. ६७

उत्तर (बी.ओ.टी.)

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
	बी.ओ.टी. तत्वावरील सिध्दार्थ उद्यान व रेल्वे स्टेशन जवळील प्रकल्पाच्या विकसकास आकारण्यात आलेल्या दंडाची माहिती देणे बाबत	बांधा वापरा व हस्तांतरीत करा (B.O.T.) या शासनाच्या धोरणास अनुसरुन औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभागृहाच्या मंजुरी अधिन राहुन शहरातील सिध्दार्थ उद्यान बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे आणि न.भू.क्र.१९१४९ रेल्वे स्टेशन जवळील महापौर बंगल्या लगत व्यापारी संकुल उभारणे करिता ९९ वर्षाच्या भाडेपट्ट्यावर देण्यात आलेले आहेत. सिध्दार्थ उद्यान बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे बाबतचा प्रकल्प विहित कालावधीत पुर्ण न झाल्याने संबंधित विकसकास दिनांक २०.०८.२००९ पासुन रुपये १,५००/- प्रतिदिन दंड आकारण्यात आलेला आहे. तसेच न.भू.क्र.१९१४९ रेल्वे स्टेशन जवळील महापौर बंगल्या लगत व्यापारी संकुल उभारणे बाबतचा प्रकल्प विहित कालावधीत पुर्ण न झाल्याने संबंधित विकसकास दिनांक ०८.०९.२००९ ते ०३.०५.२०१० या कालावधीसाठी रुपये १,०००/- प्रतिदिन आणि दिनांक ०४.०५.२०१० ते आज पावेतो रुपये २,०००/- प्रतिदिन दंड आकारण्यात आलेला आहे.

स. श्री. अशोक किसनराव बेहडे

प्रश्न क्र. ६८

उत्तर (सहाय्यक संचालक नगर रचना)

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
	प्रश्न क्र.६८ स्टील मार्केटिंग मोंढा रोड वरील अतिक्रमण का काढण्यात आले नाही.त्यांना परवानगी किती देण्यात आली याची सविस्तर माहिती देण्यात आली नाही.	दिनांक-८/८/२०११ रोजी अतिक्रमण काढण्यात आलेले आहे.इतर व्यापाऱ्यांचे ठेवलेले लोखंडी साहित्य त्यांच्या जागेत आहेत.तसेच रस्त्यावर उभे असणारे लहान-मोठे ट्रक यांना हटवून रस्ता मोकळा करण्यात आलेला आहे

स. सभागृह नेता श्री.त्र्यंबक गणपत तुपे
प्रश्न क्र. ६९
उत्तर (उपआयुक्त सिडको)

अ.क्र.	मुद्दा	खुलासा
१	**प्रश्न क्र.६९** शहरातील व शहरालगत मनपा हद्दीत असलेल्या खुल्या जागेवर अवैधरित्या प्लॉटिंग करुन विक्री केलेली आहे.अशा प्लॉटिंग विक्रेतांवर मनपाने कोणती कार्यवाही केली? व कार्यवाही केलेली नसेल तर का कार्यवाही केली नाही? शहरातील नदी-नाल्यावर अनधिकृतरित्या मोठ्या प्रमाणात बांधकाम करुन नदी-नाले अडविण्यात आलेले आहेत.अशा अनधिकृत बांधकामधारकांवर कोणती कार्यवाही करण्यात आली.	केंब्रीज शाळेजवळील बायपास रोडवरील गट नं.३८२,३८३,३६७,३६८व मुकुंदवाडी येथील सर्व्हे नं.४२,४३ येथील अनधिकृत प्लॉटिंग दि.१२/८/२०१ रोजी जे.सी.बी.मशीनच्या साहय्याने निष्कासित करण्यात आले.तसेच पेठेनगर,भावसिंगपूरा येथील स.नं.३१ व २८/२ व पिसादेवी रोड,हर्सुल येथील स.न.१०२,१०५ वरील अनधिकृत प्लॉटिंग जे.सी.बी.व मजुरांच्या सहाय्याने निष्कासित करण्यात आले.सारंग हौ.सो.गजानन नगर,गारखेडा व म्हाडा कॉलनी मक्सुद कॉलनी येथे नाल्यात चालू असलेले बांधकाम निष्कासित करण्यात आले.

स. सभागृह नेता श्री.त्र्यंबक गणपत तुपे
प्रश्न क्र. ७०
उत्तर (सहाय्यक संचालक नगर रचना)

अ.क्र.	मुद्दा	उत्तर
	शहरातील विविध मंजूर रेखांकन व भोगवटाधारक यांनी पार्कींगसाठी सोडलेल्या खुल्या जागेत दुकाने, निवास, गोदाम, इत्यादि अनाधिकृतरित्या बांधकाम केलेले आहे. अशा भोगवटाधारकाविरूध्द मनपाने कोणती कार्यवाही केलेली आहे.	**अप्राप्त**

स. सभागृह नेता श्री.त्र्यंबक गणपत तुपे
प्रश्न क्र. ७१
उत्तर (सहाय्यक संचालक नगर रचना)

अ.क्र.	मुद्दा	उत्तर
	शहरातील विविध आठवडीत बाजाराची निविदा काढण्यांत आल्या आहेत काय ? काढल्यास कोणत्या निविदाधारकांची निविदा मंजुर करण्यांत आली व कोणत्या दराने ? व किती कालावधीसाठी ?	**अप्राप्त**

स. सभागृह नेता श्री.त्र्यंबक गणपत तुपे
प्रश्न क्र. ७२
उत्तर (सहाय्यक संचालक नगर रचना)

अ.क्र.	मुद्दा	उत्तर
	सिध्दार्थ उद्यान येथील किती जागेला बांधकाम परवानगी देण्यात आली ? पार्किंग वरील माळा महानगरपालिकेने कुणाला भाडयाने दिले किंवा देण्याचा ठराव झालेला आहे काय ? B.O.T चे काम नियमानुसार चालु आहे काय ? बॉटनीकल गार्डन हे प्रकल्प कुठे प्रस्तावित आहे. प्रकल्प कोणामार्फत राबविण्यांत येते आहे ? बॉटनीकल गार्डन प्रकल्पाचा कालावधी त्यावर खर्च किती व त्याचा उपयोग कशा होईल. देखभाल दुरुस्ती कोण करणार ? BOT प्रकल्पाचे काम विहित मुदतीत न केल्यामुळे दंड आकारण्यात आला आहे काय ? त्यांनी आजपर्यत केलेल्या कामास सदरील ठेकेदारास किती खर्च आला ? मनपास प्रकल्प पुर्ण करावयाचा असेल तर अंदाजे खर्च किती ? सदरील प्रकल्पास मनपा स्वतः राबविल्यास त्याचा फायदा होईल काय ?	बांधा वापरा व हस्तांतरीत करा (B.O.T.) या शासनाच्या धोरणास अनुसरुन औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभागृहाच्या मंजुरी अधिन राहुन महानगरपालिकेकडे बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर शहरातील सिध्दार्थ उद्यान न.भू.क्र.२०७२३/पी सर्वे न.०४ एकूण ३१ एकर जमिनीपैकी ७००० चौ. मी. क्षेत्रावर प्रकल्प विकसीत करावयाचा आहे. त्यामध्ये महानगरपालिकेसाठी ५७०८ चौ.मी. एवढया क्षेत्रातील दुमजली वाहनतळाचे बांधकाम आणि विकासक हिश्यात २३७३ चौ.मी. बांधीव क्षेत्र अनुज्ञेय राहणार आहे. दुमजली वाहनतळाचे खुले छत (ओपन टेरेस) संबंधित विकसकास भाडेपट्ट्याने देणे बाबत मा. सर्व साधारण सभागृहाच्या ठरावानुसार मंजुरी प्राप्त आहे. सदर बीओटी प्रकल्पाचे काम मंजुर बीओटी निविदेतील अटी व शर्ती अनुसार मे. अथर्व ॲन्ड सुनिल डेव्हलपर्स या विकसकाकडून प्रगतीपथावर आहे. प्रकल्पाचे काम विहित मुदतीत न केल्याने दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच बॉटनिकल गार्डन बाबतचा प्रकल्प या विभागामार्फत कार्यान्वीत नाही.

स. सभागृह नेता श्री.त्र्यंबक गणपत तुपे
प्रश्न क्र. ७३
उत्तर (उपआयुक्त महसूल)

अ.क्र.	मुद्दा	उत्तर
	स्थानिक संस्था कर अंतर्गत मनपास किती उत्पन्न अपेक्षित आहे ? सद्या किती उत्पन्न मिळते स्थानिक संस्था कर नोंदणी केलेले व्यापारी किती ? पुर्वीच्या सहकार एजन्सी मार्फत जकात भरत असलेल्या व्यापाऱ्यांची संख्या किती व जकात कर किती ? औद्योगीक विकास महामंडळ व दुकान नोंदणी कार्यालयातील नोंदणीकृत व्यापाऱ्यांची यादी मागविण्यात आली आहे काय ? असल्यास व्यापाऱ्यांची संख्या किती ? स्थानिक संस्था कर नोंदणी न केलेले व्यापारी किती, अशा व्यापाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ? सद्या कार्यरत असलेले वर्ग २, ३, ४ चे कर्मचारी किती	महाराष्ट्र शासन अधिसुचना दि.०५ एप्रिल -२०११ नुसार औरंगाबाद शहराच्या हद्दीत उपयोग,उपभोग व विक्री साठी आयतीत मालावर स्थनिक संस्था कर वसुलीची अंमलबजावणी करण्यात येत आहे. शहरातील व्यापारी महासंघ ,मसीआ औद्दोगिक संघटना व शहरात असलेल्या विविध वस्तू विक्रेत्यांचा संघटनांशी ४५ पेक्षा जास्त बैठका तसेच प्रत्यक्ष चर्चा करून स्थानिक संस्था कर अंमलबजावणीसाठी सहकार्य करणे बाबत विनंती केली आहे. संबंधितांनी या विभागास संपुर्ण सहकार्य करून व्यापारी /उद्दोजकांना नोंदणी करण्यासाठी प्रवृत्त केले असून महानगरपालिकेस नोंदणी प्रक्रियेत व्यापारी /उद्दोजकांचे सहकार्य प्राप्त होत आहे. १) स्थानिक कराच्या उपेक्षीत उत्पन्न प्राप्तीच्या संदर्भाने नमुद करण्यात येते की,चालू आर्थिक वर्षातील माहे १ एप्रिल-२०११ ते ३० जून २०११ पर्यंत जकात कराची वसुली जकात संकलन अभिकर्ता यांचे मार्फत करण्यात येत होती. उपरोक्त कालावधीत जकात व रहदारी या एकत्रित करांपासून महानगरपालिकेस रक्कम रू.३४,५०,१५,०००-/ इतके उत्पन्न मिळालेले आहे. शहराच्या हद्दीत आयात होणा-या मालावर स्थानिक संस्था कर, रहदारी फीस व स्थावर मालमत्ता खरेदी विक्रीच्या किंमतीवर उपनिबंधक कार्यालयाकडून १ % दराने नोंदणी करतांना वसुल करण्यात येते असलेली रक्कम यापासून महानगरपालिकेस चांगले उत्पन्न उपेक्षित आहे. २) स्थानिक संस्था करातुन महानगरपालिकेस १ जुलै-२०११ ते १६ ऑगस्ट -२०११ पर्यंत एकूण रक्कम रू.८,११,००,०००/- उत्पन्न प्राप्त झाले आहे. ३) महानगरपालिकेकडे आजपर्यंत १०,५०० व्यापारी उद्दोजकानी नोंदणीसाठी अर्ज दाखल केलेले आहे. ४) जकात संकलन अभिकर्ता यांचेकडे जकात कर भरणा करणा-यांची निश्चित आकडेवारी या विभागाकडे उपलब्ध नाही. ०१ जुलै -२०१० ते जुन - २०११ पर्यंत जकात संकलन अभिकर्ता मार्फत रक्कम रू.१३८,००,६०,०००/- इतकी रक्कम जकात करापोटी प्राप्त झालेली आहे.

		५) मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम -२०१० नुसार मुल्यवर्धी कर विभागाकडे नोंदणी कृत असलेले व्यापारी /उद्दोजक दि. १ जुलै-२०११ रोजी महानगरपालिकेकडे नोंदणीकृत असल्याचे मानन्यात येतील.त्यासाठी विक्रीकर विभागाकडून त्यांचेकडे नोंदणीकृत असलेल्या व्यापा-यांची यादी मागवण्यात आली आहे. ६) शहराच्या हद्दीतील मुल्यवर्धित कर नोंदणीकृत व्यापा-यांची एकूण संख्या ५८७३ इतकी आहे व ते मानीव नोंदणीकृत आहेत. ७) सन २००७ मध्ये शहरातील व्रापारी यांचे बोर्डचे सर्वेक्षण करण्यात आले होते.परंतू हा सर्वे फक्त बोर्डाचाच केलेला असल्याने त्यावरून निश्चित व्यापा-यांची संख्या अवगत होत नाही. तथापि सदर यादीनुसार एकूण २५,००० व्यापरी आस्थपना समजण्यास वाव आहे व त्यानुसार कार्यवाही हाती घेण्यात येत आजहे. ८) स्थानिक संस्था कर नियम ९(१)नुसार स्थानिक संस्था कर नियमांच्या नियम-३ अन्वये किंवा नियम -५ च्रा पोटनियम (७)अन्वये नोंदणी केली जाण्यास पात्र असलेला कोणताही व्यापारी त्याच्याकडे या नियमाव्दारे तरतुद केल्याप्रमाणे वैध नोंदणी प्रमाणपत्र असल्याखेरीज व्यापरी म्हणून धंदा करणार नाही.व्यापरी व उद्दोजक यांना नोंदणीसाठी ३० जून-२०११ ही अंतिक तारीख देण्यात आली होती. परंतू व्यापारी/उद्दोजक यांच्या संघटनांच्या विनंती वरून दि.७/८/२०११ पर्यंत मुदत वाएवून देण्यात आली होत४ी. नोंदणी न करणा-या व्यापा-यांविरूध्द स्थानिक संस्था कर नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.सध्या या विभागात वर्ग-२ संवर्गातील ०३ अधिकारी,वर्ग-३ संवर्गातील ३९ व वर्ग-४ संवर्गातील २० असे एकूण ६२ अधिकारी /कर्मचारी कार्यरत आहेत.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

.